# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०२/२००४

आज दि. २०/०२/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ११ दि. १२/०२/२००४ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ५) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ६) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ७) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| ८) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ९) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ११) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १४) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १५) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १६) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १७) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| १८) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १९) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २०) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २१) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २२) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २३) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २५) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २६) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २७) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २८) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| २९) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३०) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३१) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३२) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३४) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३५) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ३७) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ३८) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३९) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ४०) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४१) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४२) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ४४) | श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा | सदस्य |
| ४५) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४६) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४७) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ४८) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ४९) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५०) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५१) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५२) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५३) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५४) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |
| ५५) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | सदस्य |
| ५६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५९) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६०) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६१) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६३) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६६) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६७) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ६८) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ६९) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| ४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ५) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ६) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ७) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझ्झफर हुसेन | उपमहापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. परशुराम दामोदर पाटील | विरोधी पक्षनेता |
| ४) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त, विरोधी पक्षनेते, उपायुक्त व सर्व उपस्थित सदस्य, मनपा अधिकारी व पत्रकार बंधू आपले सर्वांचे स्वागत. आपणास माहितच आहे की, आपल्या महापालिकेने नविन दवाखाने सुरू केले आहेत. नागरिकांना त्याचा फायदा होत आहे. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद. तसेच सरकारी दवाखाने लवकरच महापालिकेस मिळणार आहेत. ही सुद्धा चांगली बातमी आहे. आपल्या आर.ओ.बी.च्या उद्‌घाटनाची तारीख लवकरच जाहिर करण्यात येईल. सचिव सभेचे कामकाज सुरू करावे. धन्यवाद.

**प्र. सचिव :-**

महापौरांच्या परवानगीने प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करीत आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौरांच्या परवानगीसे बोलती हूँ। यह जो विषय अधूरा रह गया था। बी. के. तिवारी का। त्याला बांधकाम परवानगी दिली नाही आणि सर्व प्रकरणावर आपण कार्यवाही केली आणि जी सर्व प्रकरण न्यायालयात प्रविष्ट आहेत. साहेब, पहिल्या प्रकरणाबद्दल मी विचारु इच्छिते की, सदर प्रकरण आहे त्याचा निर्णय लागलेला आहे की नाही त्याची माहिती पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

हा जो दुसऱ्या नंबरचा प्रश्न आहे त्या संदर्भात आपण असे म्हणालात की, हा जो दुसरा प्रश्न आहे त्याच्यावर पुढच्या मा. महासभेत चर्चा करायला मला वेळ मिळेल का? म्हणून आपला दुसरा प्रश्न ह्या सभेत घेण्यांत आला. त्यावर आपल्याला जे प्रश्न विचारायचे आहे ते आपण विचारु शकता. सध्या आपल्या प्रश्नामधून दुसरा प्रश्न येथे आहे.

**रिटा शाह :-**

मी पहिल्या किंवा दुसऱ्या प्रश्नाबद्दल विचारत नाही. आपण मला असे उत्तर दिले आहे की, सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तर त्याचा निर्णय लागलेला आहे का? वकिलांना आपण किती प्रकरणे दिलेली आहेत आणि त्या दिलेल्या प्रकरणामधून किती प्रकरणांचे निर्णय लागलेले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी विचारलेल्या प्रकरणामध्ये स्टेटस्को आहे आणि त्याचे निकाल लागलेले नाही. पहिल्या प्रकरणाप्रमाणे ह्या सगळ्या प्रकरणांमध्ये ॲज इट इज स्टेटस्को आहे.

**रिटा शाह :-**

४९ केसचा निर्णय लागलेला आहे व त्या वकीलाने ४९ चे बिल सादर केलेले आहे. त्याचे संपूर्ण डिसीजन लागले होते आणि त्याच्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही. तेही साहेब, ४९ केसचे निर्णय लागले आणि ते नाईक साहेबांनी बघितलेले आहे आणि ते आलेले बिल मी पाहिले आहे. साहेब, तुमचा तो इंटरनल कारभार होता. त्याच्यात प्रायव्हेट किंवा सिक्रेट मॅटर होता. आयुक्त साहेब त्यावर मी आपला देखील रिमार्क वाचला होता आणि हे बोलायला मला लाज, शर्म वाटत नाही. त्याच्यावर ज्यांचे ज्यांचे रिमार्क होते त्या सर्वांचे मी रिमार्क वाचले आहेत. ही जी बिल्डींग आहे ती इलिगल आहे आणि ती परमीशन न घेता कनेक्शन लागले आहे, ते आपण कापणार आहात का? त्या निर्णयाबद्दल आपण का कार्यवाही केली नाही त्याचे उत्तर मला मिळणार आहे का? त्यावर आपण जरुर कार्यवाही केली होती आणि स्टेटस्कोचा अर्थ असा होता की, तुम्ही कार्यवाही करायची नाही आणि त्याने बिल्डींग बांधायचे नाही. वकीलांची फाईल ही केसरीनाथ म्हात्रे ह्यांच्याकडे होती ती मला वाचायला नाही पाहिजे होती पण ती मी वाचली. त्याच्यात तुम्ही लिहिले आहे ४९ केसचे निर्णय लागले आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर साहेब.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण मला बोलायला वेळ द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, हे जे वकीलांचे पत्र आहे ते बिल मागणी केल्याचे पत्र आहे आणि त्यांनी कळविल्यानंतर फॅक्सने आल्याबरोबर आपण ॲक्शन घेतो. एक-दोन वर्षापुर्वीचे ते बांधकाम नाही ९४-९५ ला ते रहिवास व्याप्त झाले ते निकाल त्या त्या वेळी कळविले असते तर त्याच वेळी डिमॉलेशन झाले असते. पण वकीलांनी वेळेवर कळविले नाही. ते आम्ही आयुक्त साहेबांच्या निर्दशनास आणले व त्या त्या वेळी निकाल झाल्यानंतर त्यावेळी कळविले असते तर कार्यवाही करण्यांत आली असती. तत्पुर्वी वकीलांना पत्र पाठवले असतांना देखील ९४-९५ च्या झालेल्या बांधकामांचा कोर्टाने निकाल दिला आणि जे निवासी झाले आहेत त्यांचे लिखाण करण्यासाठी सांगितले आहे. ते चुकून कर्मचाऱ्यांनी ठरविले नाही आणि बिलामध्ये त्यांनी कळविल्यामुळे वर्षभर बिल मागणीमध्ये कोंडले ही वस्तुस्थिती आहे.

**रिटा शाह :-**

आपल्याकडून असेच उत्तर येणार हे मला महिती होते आपण असेच उत्तर देणार. मी पण नगरसेविका आहे, लोकप्रतिनिधी आहे. गेल्या अकरा वर्षापासून नगरसेविका आहे. पण कधी बोलले नव्हते. पण आता बारा वर्षानंतर मी एवढे बोलायला लागली आहे. ह्याचा अर्थ मी पण एवढे वर्ष झोपली होती आणि आता जागी झाली आहे. ह्यात मला काही शर्म वाटत नाही की, मी एवढ्या वर्षानंतर बोलायला लागली आहे. प्रश्न तो नाही की, आपले अधिकारी झोपले. आपण असे बोलतो की, वकीलांना केस दिली होती आणि ते काही बोलले नाही. तर जो अधिकारी हे सर्व प्रकरण बघतो त्याने आपल्याला कळवायला पाहिजे. आपले अधिकारीपण त्याची शहानिशा करतात. त्यांनीदेखील आपल्याला कळवायला पाहिजे होते. म्हणजे त्या ऑफीसरने आपली ड्युटी बरोबर बजावली नाही. तर आपण त्याला निलंबित करणार आहात का साहेब. त्यातील काही भाग कमर्शिअल आहे आणि मला एवढे माहिती आहे की, कमर्शिअल गाळेपण आपण तोडू शकतो. नाईक साहेब हे साहेब आहेत. त्यांची दिशा त्या कर्मचाऱ्याने चुकवायची नाही आणि जो कारभार चालला आहे तो बरोबर नाही. नाईक साहेब हे कॅबिनमध्ये बसतात. पण जे क्षेत्रिय अधिकारी आहे ते काय काम करतात. ते साहेबांपर्यंत माहिती देत नाही का? आणि ते काय करतात ते त्यांना कळत नाही. त्या वकीलांनी काय काम केले. आपण जे ऑफीसर ठेवले आहेत त्यांनी काय केले आहे व त्यांची फी पुरी करायची नाही अशी मी मागणी करते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम ह्या सर्व प्रकरणावर सर्व मुद्यांवर सविस्तर चर्चा करावी व वकीलांकडून माहिती मिळावी म्हणून बोलावले होते, सविस्तर चर्चा करण्यासाठी त्या चर्चेमध्ये नगरपालिकेने स्टेटस्को असतांना नगरपालिकेने कार्यवाही करु नये अशी ऑर्डर केलेली आहे व त्यामुळे आम्हांला कार्यवाही करता आली नाही व हे सर्व वकील मा. आयुक्त साहेब यांच्याकडे गेले होते. त्यांनी सांगितले की, आपण पाठपुरावा करावा आणि माहिती घेऊन केसचा निकाल लावून घेणे. त्यांना त्यांचे ऑफीस सांभाळून केस बघावे लागते. ते सन १९९४-९५ चे इलिगल बांधकाम होते. त्याचा आत्ताच निकाल लागला असता. आपण त्यांना आता कार्यवाहीबाबत कळविले आहे. त्याबाबत मी आपल्यासमोर रिपोर्ट सादर करेन व जे बिलाबाबत जो काय निर्णय घ्यायचा आहे त्याबाबत आपण निर्णय घ्यावा.

**रिटा शाह :-**

वकीलांना स्थायी समितीच्या अध्यक्षांनी चर्चा करण्यासाठी व त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी बोलावले होते हे मला माहिती आहे. कारण जेव्हा स्थायी समितीमध्ये विषय निघाला होता तेव्हा मी बोलले होते त्यावेळी सभापती साहेबांनी निर्णय दिला होता की, मी पुढच्या गुरुवारपासुन वकीलांना बोलावेन आणि त्यांच्याकडून माहिती घेवून मी बघणार. असे कायदेशीर करण्याची स्थायी समितीच्या सभापतींना अधिकार आहेत का? शेवटी आपण ते मॅटर सोडविले पाहिजे. कारण वकीलांना आपण जी माहिती देतो त्याच माहितीच्या आधारावर ते केस लढत असतात. पण हे जे मॅटर आपल्यासमोर आहे ते मॅटर वेगळे आहे. स्थायी समितीच्या चेअरमनने वकीलांना बुधवारी बोलावले होते. तेव्हा मी ही हजर होते व त्यात कायदेशीर बाबी दिल्या आहेत. जर कुठल्याही मॅटरवर स्टेटस्को असेल तर त्याचा अर्थ काय? कॉर्पोरेशन त्या ठिकाणी काही कार्यवाही करु शकत नाही असे वकीलांना सांगितल्यावर

मला स्टेटस्कोचा अर्थ कळला. पण कॉर्पोरेशनने काही कार्यवाही करायची नाही आणि त्या बिल्डरने बिल्डींग बांधून घ्यायचे असे होत नाही. आणि बिल्डिंग तोडण्याचे आदेश क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिले पण ते बांधकाम झाले व त्याबाबत वकीलांनी काय दिले त्याची मी आपल्याला एक एक कॉपी पण दिली आहे आणि हा प्रश्न आता दुसऱ्या वर्षी आला आहे. तरी सुद्धा चालेल. पण ह्यात ज्या अधिकाऱ्यांची चुक असेल त्याला सांगा ४९ केसेसची माहिती नव्हती? आपण एवढा मोठा विभाग सांभाळत आहात त्याबद्दल आम्ही तुमचे अभिनंदन ही केले आहे. कुठल्याही एका अधिकाऱ्याला आपण आता नेहमी नेहमी सांगतात हे झाले ते झाले पण साहेब मागे काय झाले व आता आपल्याला या शहरामध्ये काय करायचे आणि आपण काय चांगले करू शकतो कारण तुमच्या सारखा डॅशिंग ऑफीसर आम्हाला लाभलेला आहे आणि तुम्ही काहीतरी चांगले असे डॅशिंग कार्यवाही कराल अशी आम्ही तुमच्याकडून इच्छा करतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जेव्हा स्टेटस्को ॅकार्पोरेशन कडून बोलतो तेव्हा कार्पोरेशनला काहीच करता येत नाही. जरी त्या बिल्डरने ती बिल्डिंग बांधली तरी आमच्याकडे त्याचे फोटो काढलेले असतात आणि त्यांनी ते बांधकाम केले किंवा मंजुरी पेक्षा जास्त बांधकाम बांधले असले आणि ह्या दोन तीन वर्षामध्ये नगरपालिकेने बंदी घातली आणि त्या मालकाचा त्या ऑर्डरमध्ये उल्लेख आहे त्यामुळे आम्हाला काही कार्यवाही करता येत नाही अशी परिस्थिती आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, पन्नास लाख, एक कोटी डेव्हलपमेंट चार्ज वसुली होत होती हे फक्त आपल्या निर्दशनास आणू इच्छितो. आता परवानगी घेउन काही बांधकामे झाली त्याचे सर्वे करायला पाठवले व जे इललिगल बांधकाम होते ते देखील कोर्टाचा स्टे नसताना तोडायला पाठवले. ते ह्या पुर्वीच्या दराने संयुक्तिक होणार नाही म्हणजे ॲक्शन काल होत असल्यामुळे परवानगी वाढवण्याचे कळविले आहे हे आपल्या निर्दशनास आणले.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आज जो हा १८० करोड रूपयाचा बजेट झाला आहे म्हणून आम्ही नगरसेवकांनी मिळून फार मोठा तीर मारला व हा बजेट तयार केला तर ह्याच्यात काही मोठी बाब नाही आहे. साहेब, मी मागे ही बोलले आहे, असे ही काही प्रकरण आहे की जिथे स्टेटस्को आहे ती बिल्डिंग तुमच्या राज्यात बांधून झाली आहे त्याबद्दल मी तुमच्याकडे लेखी दिलेले आहे ते वॅलीड आहे आणि स्टे घेतलेला आहे तरी बांधकाम चालू केले आहे असे मी तुम्हाला पत्र दिले आहे व त्या पत्राची झेरॉक्स ही तुम्हाला दिलेली आहे. त्या बिल्डिंगची मी तुमच्याकडे तक्रार केली आहे तर तुमचे ऑफीसर मला सांगतात की, ती बिल्डिंग कुठे आहे ती आपण मला दाखवा आणि तेच ऑफीसर त्या बिल्डिंगच्या बाजूला जी बिल्डिंग ती ऑक्युपाईड झालेली आहे व त्या ऑफीसरला ती बिल्डिंग का मिळत नाही?

**मा. केळकर सो. :-**

मी तपासुन माहिती घेतो.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नाईक साहेबांनी जे वक्तव्य केले त्याला माझा आक्षेप आहे. वन साईड जेव्हा स्टे मिळतो व आपण कोणतीही कार्यवाही करत नाही, ते का? जज्जने आदेश दिलेला आहे त्याला काही हायर ॲथोरिटी नाही आहे का? जेव्हा परमीशन दिली जाते त्याची हायर ॲथोरिटी पाहिजे. आपण त्याचा विरोध अपील करू शकतो का नाही, आणि अपील केले का नाही?

**मा. आयुक्त सो. :-**

गेल्या काही दिवसापासून प्रशासनाच्या ठेवणेबाबत चर्चा होत आहे. पण खरे तर प्रशासनाची ठेवण ह्याच्यापेक्षा वेगळी आहे असे समजण्याचे काही कारण नाही. तसे कुठल्या विभागामध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा पाहिजे ते आपण सूचवा आणि आपण सांगितलेल्या गोष्टी जेव्हा माझ्या लक्षात आले तेव्हा ह्याच गोष्टीवर मी महत्त्वाचा निर्णय असा दिला होता की, असे जे इलिगल काम चालू आहे त्या कामाला आपण नोटीस द्यायची व त्या जागेवर जे बांधकाम करण्याचे काम चालू आहे त्या जागेवर संबंधित बिल्डरने बोर्ड लावावा जसे की, ते बांधकाम किती एरियाचे आहे वगैरे. जेणेकरून तिथे गेलेल्या अधिकाऱ्याला माहिती मिळेल आणि त्यांना ते बोर्ड लावण्याची मी सक्ती केलेली आहे. जरी ते लिगल बांधकाम असले तरी त्यांनी एक विशिष्ट बोर्ड लावला पाहिजे त्यांनी जर ती प्रक्रिया पुर्ण केली नाही व ते बांधकाम अनधिकृत असेलतर ते बांधकाम तोडण्यात यावे अशाप्रकारचा मी आदेशही दिलेला आहे. तसेच घरपट्टी, पाणीपट्टीचे कनेक्शन, असेसमेन्टचे काम चालू आहे व त्याच दरम्यान आपल्याकडे सॉफ्टवेअर इंजिनिअरची निवड केली व असा निर्णय घेतला की, त्यांनी फक्त असेसमेन्ट ॲण्ड रिकव्हरी

चे जे काम आहे ती जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी आणि जेव्हा याबाबत एक बैठक आम्ही आयोजित केली तेव्हा इंजिनिअरची त्यांनी मागणी केली होती त्यांनी ती अडचण माझ्यापुढे ठेवली व ती अडचण असूनही आपल्याला नेमून दिलेले काम केले पाहिजे अशा प्रकारचा त्यांना मी आदेश दिला व त्याची देखील कार्यवाही सुरू झालेली आहे. हे सध्या असलेल्या परिस्थितीवर नियोजन करण्याचा भाग होता. तसेच, मा. महासभेमध्ये कोर्टाच्या कामकाजाबाबत चर्चा करणे अपेक्षित नाही. ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे आणि त्यामुळे त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे भाषण करणे मला योग्य वाटत नाही. पण आपल्याला त्याची माहिती पाहिजे, तर त्या माध्यमात चर्चा नक्कीच होउ शकते. ज्याच्यावर कार्यवाही झालेली नाही त्याच्यावर स्टेटस्को होता आणि महापालिकेला विशिष्ट असा स्टेटस्को मेनटेन करण्याचा आदेश असतो अशा आदेशाचा विरोध करू शकतो. पण त्यात आपली बाजु कायदेशीर असेल तर त्याच्यावर निर्णय होईल त्यावेळी मी कार्यवाही करण्यास हयगय करणार नाही आणि जर ते आदेश आपल्या विरोधात असेल तर आपल्याला त्याच्यावर अपील करावे लागेल व त्यामुळे पुढे आपल्याला कारण नसताना खूप जास्त खर्च सोसावा लागेल हे सर्व करण्यासाठी जी व्यवस्था आपल्या महानगरपालिकेमध्ये होती ते फक्त फॉरम्यालिटी म्हणून आलेल्या केसेस तपासून पूर्ण ती केसमध्ये माहिती घ्यावी ही परिस्थिती लक्षात घेउन आपल्याकडे त्याबाबत सविस्तर रेकॉर्ड असावा व ह्या क्षेत्रातील संपुर्ण माहिती, ज्ञान असावे व आपला कायदेशीर विभाग व्यवस्थित सेट व्हावा याकरिता विधी सल्लागार नेमण्यात यावा. ही परिस्थिती लक्षात घेता आम्ही स्थायी समितीसमोर विधी सल्लागार नेमणेबाबतचा प्रस्ताव ठेवला होता. पण स्थायी समितीने तो विषय त्यावेळी नामंजुर केला पण आता त्यानंतर पुन्हा येत्या स्थायी समिती समोर आपण हा विषय ठेवणार आहोत आणि हे कायदेविभाग सक्षम रितीने चालविण्याकरिता सक्षम असा व्यक्ती पाहिजे. व ती जी व्यक्ती आहे ती ठाणे केंद्रामध्ये चांगले असे काम केलेले आहे व हया कायदेविभागात ह्या केसेसची योग्य अशी तपासणी करून त्याच्यामध्ये अपील करता येणे शक्य आहे. त्यात कायदे अधिकाऱ्यांचा खर्च आहे. विधी सल्लागार नेमणेबाबतचा हा जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावाविषयी पुन्हा चर्चा करा आणि नाईक साहेबांनी डेव्हलपमेंट चार्जची वसुली होत आहे आणि अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांना महत्त्वाची अडचण असते ते विकास करात. विकास कर तीस रूपये, पन्नास रूपये ठरवायचे त्यापेक्षा अनधिकृत बांधले तर चांगले असे समजले जात आहे. पण त्याच्यावर प्रशासनाला कार्यवाही करण्यात यश मिळत आहे. आपण ह्याच्यावर भरपूर चर्चा केलेली आहे आणि आपण जो मुद्दा उपस्थित केला तर ह्या केसेसची आम्ही स्क्रुटनी करून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करू आणि जर ते योग्य वेळी कळविले गेले असते तर कदाचित त्याचा निकाल अगोदर ही झाला असता. पण त्याच्यामध्ये आवश्यक जे आहे ते तसेच त्या निकालावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. मला वाटते एवढा खुलासा आपल्याला पुरेसा आहे.

**रिटा शाह :-**

आपण संबंधितांना बचावण्याची गरज नाही. साहेब, मी आज आपल्याला ठामपणे सांगते आणि मागणी ही करते की, केसरीनाथ म्हात्रे आणि राणे ह्यांच्याकडून ते डिपार्टमेंट काढून घ्या. साहेब, ह्याच सभेत केसरीनाथ म्हात्रे ह्यांना शोकॉज नोटीस देण्याचे ठरले होते त्या नोटीसचे काय झाले? जेव्हा एक लोकप्रतिनिधी नोटीसची मागणी करतो तर त्यात काहीतरी असे असते म्हणून, रिटा शाह म्हणून व एक लोकप्रतिनिधी म्हणून मी मागणी करत आहे आपण ह्यांच्याकडून हा डिपार्टमेंट काढून घ्यावा व त्यांचे ट्रान्सफर करावे व ज्यांनी लिगली, कायदेशीर ज्ञान आहे आणि त्या डिपार्टमेंटचे जे जुने कर्मचारी आहेत त्यांना आपण हा विभाग सांभाळण्याचे परमीशन द्यावे.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण आम्हाला सूचवा त्या खात्यावर कोणाला नेमायचे?

**रिटा शाह :-**

साहेब, आम्ही आपल्याला कोणाला नेमायचे ते कसे सुचवणार, ते आपण नेमले पाहिजे. आमची जी सूचना आहे, मागणी आहे ती आम्ही आपल्यासमोर ठेवली आहे आणि आपण जे बोललात की, स्टे असताना जे बांधकाम झालेले आहे त्याच्यावर आम्ही कार्यवाही करू. पण याबाबत निर्णय आलेला होता ते वकीलांनी लपविले, की तुमच्या कोणी अधिकाऱ्यांनी लपविले आहे ते मला माहित नाही. कारण त्याच्यावरचा निर्णय लपवला म्हणून ती बिल्डिंग ऑक्युपाईड झाली आहे आणि त्या बिल्डिंगमध्ये राहणारे लोक आहे त्यांचे काय? आणि हे जे इललिगल बांधकाम आहे त्याला कनेक्शन कसे लागले? ज्या बिल्डिंगला सी.सी. नाही त्या बिल्डिंगला तुम्ही नळ कनेक्शन कसे देता?

**मा. आयुक्त सो. :-**

याबाबत आपल्याला केळकर साहेब हे व्यवस्थित माहिती देतील.

**रिटा शाह :-**

हे जे कनेक्शन द्यायला परमीशन दिली त्याबाबत केळकर साहेबांनी योग्य ती चौकशी करून परमीशन द्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त सो. :-**

चुकून झाले असेल, तर आपण ते करू.

**रिटा शाह :-**

साहेब, चुकून झाले आहे किंवा जाणुनबूजुन झाले आहे तरी ते गुन्हापात्र आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

आमच्या प्रशासनाला दोन्ही सारखे असते.

**रिटा शाह :-**

ह्या विषयामध्ये पाणी विभागाकडून माहिती घेउन आम्हाला देणार का?

**मा. आयुक्त सो. :-**

होय. पण आपण देखील मला याबाबत सर्व सविस्तर माहिती द्या.

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)**

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ४ मध्ये माझे संभाषण राहिले आहे त्याच्यात जिल्हाधिकारी यांच्याकडे बाकीच्यावर कारवाई का केली नाही? असे पाहिजे.

**रिटा शाह :-**

पान न. ८ मध्ये पण तिथे देखील काही कारवाई जरुर केली त्या शब्दा ऐवजी तिथे देखील आपण काय कार्यवाही केली असे मी बोललो आहे. तसेच त्याच परिच्छेदात जो सर्वे नं. ५०० उडाव अपार्टमेंट दिले आहे त्याऐवजी रूडा अपार्टमेंट असे पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. १५ मध्ये पाच पाचचा स्लॉट तुम्ही करा असे लिहिले आहे तर त्या स्लॉटऐवजी प्लॉट हा शब्द पाहिजे. तसेच या चुका ग्रॅमॅटिकल नाहीत आणि त्या अक्षम्यसुद्धा नाहीत तर त्या ऐवजी या चुका ग्रॅमॅटिकल नाहीत आणि त्या अक्षम्य नाहीत असे पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. ४८ मध्ये अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये त्याऐवजी (ज) १ अन्वये असे पाहिजे आणि पान नं. ५० मध्ये सन्मा. सभागृह नेते लिओ कोलासोजी ह्यांचे संभाषण आहे गेंडयाच्या कातडीचे त्याला मी आक्षेप घेतला होता की, असे मी बोललो ही नव्हतो असे माझे संभाषण आहे ते नमुद केलेले नाही. ते नमुद करावे. तसेच पान नं. ७५ मध्ये जो ४८ नंबरचा ठराव घेतला आहे तो ठराव मताच्या बाजूने आणि ठरावाच्या मताच्या विरोधात असे दोन्ही ठराव आले पाहिजे होते, पण मी जो ठराव मांडला होता तो ठराव आलेला नाही. ते दोन्ही ठराव लिहायला पाहिजे. सचिव साहेब इतिवृत्तांतामध्ये तुम्ही त्या ठरावाची नोंद करणार का?

**प्र. सचिव :-** होय.

**रिटा शाह :-**

२०/१/०४ रोजीच्या इतिवृत्तांत पान नं. ९ मध्ये टी. के. तिवारी लिहिण्यात आले आहे. त्याऐवजी बी. के. तिवारी असे पाहिजे आणि पान नं. १० वर शेवटून चौथ्या ओळीत खंड लिहिले आहे त्याऐवजी प्लॉट लिहायला पाहिजे.

**प्रकरण क्र. ६५ :-**

दि. १९/२/२००३ व दि. २०/१/२००४ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र.**

दि. १९/१२/२००३ व दि. २०/०१/२००४ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ६६ करिता दिल्लीवरुन अधिकारी येणार आहेत. तरी सदरचा विषय नंतर घेणेंस सभागृहाची मंजुरी असेल तर.

**प्रफुल्ल पाटील :-**

या विषयाशी काय संबंध आहे. या विषयाशी काहीही संबंध नाही तर मग वेगळी सभा बोलवा. दिल्लीच्या अधिकाऱ्यांचा यामध्ये काय संबंध आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पाटीलसाहेबांनी स्टेमच्यासंबंधी जे नियम केले आहेत. ते नियम समजावून सांगण्यासाठी त्या अधिकाऱ्यांना बोलावले आहे. स्टेमचे वर्किंग काय असावे? तिन्ही महापालिका एकत्र असल्यामुळे ते नियम काय आहेत हे समजावून सांगण्यासाठी त्या अधिकाऱ्यांना बोलावले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्टेम प्राधिकरण गेली पाच वर्षापासून अस्तित्वात आहे. विशेषतः ज्या स्टेमवर जी कामे केली ती कायदेशीर होती का? मग जे आपण पाच वर्षे काम केले ते बेकायदेशीर होते का? पाच वर्षात शासनाला कधी वाटले नाही की, ही बेकायदेशीर बाब आहे. शासन जेव्हा प्राधीकरण करायला परवानगी देते तेव्हा कुठलेही प्राधीकरण महाराष्ट्रात नको असे म्हणत नाही. सगळया बाबतीत प्राधीकरण कामे करताना निविदा मागवितात, वर्क ऑर्डर देतात. मग असे अधिकार कंपनीमार्फत मिळविण्याचे प्रयोजन काय? प्राधीकरण गव्हर्नमेन्टने बेकायदेशीर केले आहे का? मग आता ही बाब कशी आली स्पष्ट करा.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे प्राधीकरण गव्हर्नमेन्टने स्थापन केले. तिन्ही महापालिका मिळून, जी.आर. काढून प्राधीकरण स्थापन केले. कायदेशीर स्टेटस बनवून इतर नियम काय आहेत? काय सवलती मिळाव्यात यासाठी स्टेमने ज्या सर्व महापालिकेच्या वतीने कायदेशीर नियम करण्यासाठी नियुक्ती केली आहे. त्यानंतर कायदेशीर अधिकार प्राप्त होतील. त्यासाठी नियम बनवून महापालिकेची संमती मिळाल्यानंतर व आपल्याकडून संमती मिळाल्यानंतर ते नियम पाठविण्यात येणार आहेत. तो जी.आर. काढून संमती घेतली होती. जे बाकीचे नियम नव्हते. ते बनवायला दिले आहेत आणि त्यांना कायदेशीर स्टेटस निर्माण व्हावे यासाठी प्राधीकरणाची मंजुरी असल्यामुळे महापालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर येणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाला सुरुवात केली नाही. विषयाचे वाचन झाले नाही. मग हे विषय कशाला ठेवता? विषयाचे वाचन करायचे का?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तिन्ही महापालिकेने ठराव करुन हे नियम कायदेशीर बनविण्यासाठी.

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)**

**मा.महापौर :-**

हा विषय पुढे घ्यावा.

**जयंत पाटील :-**

आपले नियम काय म्हणतात? विषय पुढे घेण्याची पद्धत काय? एक विशिष्ट परिस्थिती असेल तर विषय पुढे ढकलला जाईल. अशी परिस्थिती आहे काय? सदरचा विषय पुढे ढकलता याबाबत काही नियम आहे काय? नियम असेल तर ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

एक परिस्थिती अशी आहे की, मी मा. महापौर मॅडम यांना विनंती करिन की, स्टेमचे फायनानशिअल ॲडव्हाइजर आहे. ते सध्या दिल्लीत असल्याने धुक्यामुळे त्यांना घेउन येणारे विमान एक तास लेट येणार असल्याने सदर सभेस अर्धा ते एक तास उशीर होईल म्हणून सदर विषय पुढे घेण्यात यावा.

**जयंत पाटील :-**

या विषयासंबंधी ठाणे महापालिका, भिवंडी महापालिका आणि आपली महापालिका एवढेच या विषयाशी संबंधित आहेत.

**मा. आयुक्त :-**

चर्चेच्या वेळी बॅकग्राउन्ड सांगा. त्यांच्याकडे निर्णय घेतलेला नाही. त्यावेळेला हा विषय शेवटी घ्यायला आपली परवानगी आहे का?

**जयंत पाटील :-**

सभागृहाची मान्यता असेल तर विषय नंतर घेण्यात यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकदा विषय चर्चेला आणता. दिल्लीतील लोक आम्हाला सांगणार आणि आम्ही त्यावर निर्णय घेणार आहे. आपण माहिती दिली. त्यामध्ये आपले स्टेटस काय आहे? हे तुम्ही नमुद करित नाही. निविदा तुम्ही मागवित नाहीत का? तुम्ही विषय आणाल आणि असेही म्हणाल राष्ट्रपती येणार मग राष्ट्रपती आले काय आणि नाही आले काय. आम्हाला त्याच्याशी काही देणं-घेणं नाही. मग याबाबत सभागृहाला योग्य ती माहिती देण्यात यावी.

**मा. आयुक्त :-**

जेवढी माहिती देण्यात आली तेवढी दिलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही हे म्हणता आम्ही कशाप्रकारच्या निविदा काढणार? इन्कम टॅक्स कसा वाचणार नाही. आय ॲम नॉट डिसाईडेड इटस ॲथॉरिटी डिक्लेअर बाय द गव्हर्नमेन्ट, असे तुम्ही म्हणू नका. एकतरी ठराव करा. स्टेम ॲथॉरिटी लिगल आहे की इललिगल आहे. त्यांची काय मागणी आहे. स्टेमची मिटींग घेउन त्यांच्या निर्णयानुसार मिटींगमध्ये ठरल्यानुसार स्टेमचे डिमॉलेशन करायचे का?

**लिओ कोलासो :-**

आपला हा जो स्टेम प्राधीकरण वैधानिक दर्जा देण्याच्या संदर्भात सभेत विषय चालला आहे आणि महासभेच्या कामकाजासाठी असणारी टिपणी आयुक्तसाहेब आपण दिलेली आहे. स्टेम प्राधीकरणाला वैधानिक दर्जा देउन त्याप्रमाणे पुढच्या कार्यक्रमासाठी महापालिकेची मानसिकता तयार करावी. हे जे एकंदर आपल्या टिपणीमधून व्यक्त होत आहे. सन्मा. सदस्य आणि माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी उल्लेख केल्याप्रमाणे स्टेम प्राधीकरणाचा वैधानिक दर्जा दयायचा असेल तर त्याच्या कामाचे कायदेशीर स्वरुप काय आहे. अनकॉन्स्टीटयुशनल आहे असे मत देते वेळी परत विचार करण्यासारखा असला तरी हा विषय पीठासीन अधिका-यांच्या मान्यतेने आलेला आहे. त्याप्रमाणे आपण टिपणी दिलेली आहे. दिल्लीहून येणा-या माणसाची व्यवस्थित व्यवस्था करायला पाहिजे होती. दिल्लीहून येणारे अधिकारी काही तांत्रिक अडचणीमुळे लेट येण्याची शक्यता आहे. तर अधिकारी आल्यानंतर त्यांचे मार्गदर्शन घेउन त्याचा फायदा महापालिकेस होणार असेल तर सन्मा.सदस्य प्रफुल्ल पाटील आमची सत्ताधारी पक्षाचे म्हणणे काय आहे? हा विषय सभागृहापुढे विचारार्थ ठेवलेला आहे. राष्ट्रपती, केन्द्र सरकार, राज्य सरकार, आयुक्त यांचे आपल्या शहराशी नाते आहे. त्याची चर्चा व्हायला पाहिजे. आयुक्तसाहेब, ही टिपणी जरा ओजड आहे. कारण की, याच्यातील विधी, उपविधी दिलेले आहेत. त्याच्यावर वैधानिक दृष्टिने चर्चा होणे आवश्यक आहे. त्यातील त्रुटया समजायला पाहिजेत. काही शंका असतील तरी त्या शंका उपस्थित सदस्यांच्या माध्यमातून त्या शंकेचे निरसन व्हायला पाहिजे. म्हणून हा विषय विचारार्थ होणे आवश्यक आहे. तशी सत्ताधारी पक्षाची भूमिका आहे. म्हणून पीठासीन अधिकाऱ्यांना आमची विनंती आहे की, दिल्लीहून किंवा मुंबईहून येणारे अधिकारी असतील किंवा त्यांच्या मार्गदर्शनाची सभागृहाला आवश्यकता असली तरी हा विषय पुढे घ्यावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी त्यांच्या सत्ताधारी पक्षाची टिपणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लक्षात आले असेल की, सत्ताधारी पक्षाला हा विषय चर्चेसाठी आणायचा होता. हा विषय समजणे अवघड आहे. हया ठरावाला तुम्ही समर्थन करता असे बोलायचे कारण नाही. आमची हीच अपेक्षा असते की, तुम्ही सभागृहनेते आहात. तुम्ही आता तुमचे मत मांडलेले आहे. याबाबत काही त्रुटया असतील तर त्या सांगा. या तुमच्या माहितीनुसार सांगा की या टिपणीत हया हया त्रुटया आहेत. पाच मिनिटात चर्चा होईल. तुम्ही हा विषय आणते वेळी समर्थ होता का?

**मोहन पाटील :-**

सभागृह नेते यांनी आपली बाजू मांडली आहे. हा विषय घ्यायची गरज काय आहे काय नाही याबद्दल सभागृह नेत्यांनी आपली भूमिका मांडलेली आहे. पण मला वाटते की हा विषय पुढे ढकलावा

कारण दिल्लीचे अधिकारी येणार असे प्रशासनाचे म्हणणे आहे त्यामुळे हा विषय नंतर घ्यावा आणि मागचे विषय क्रमाने घ्यावे असे मी सुचवित आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय क्रमाने घेण्याच्या बाबतीत पध्दतशीर मार्गदर्शन केलेले आहे. स्टेम प्राधीकरणबद्दल स्वतःचे मत काय आहे ते बघुया. पण ठराव काही दिसत नाही. स्टेमची इच्छा काय आहे? कंपनी फर्म करायची का? म्हणून मी मागे म्हटले आहे की, तुम्ही दिलेली टिपणी व्यवस्थित नाही. सन्मा. सदस्य लिओ कोलासो हे देखील सिध्द करतात.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य आपण कुठल्या पध्दतीने बोलत आहात? कुठली पध्दत तुम्हाला बोलायची माहिती आहे का?

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही राष्ट्रपतींच्याबाबत बोललो होतो. तुम्हाला बोललो नव्हतो.

**मोहन पाटील :-**

पुढचा विषय घ्या हा विषय पेन्डीग ठेवा.

**(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)**

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. मी सभागृहात प्रकरण क्र. ६७ महिला व बालकल्याण समिती स्थान करणेबाबतचा ठराव वाचून दाखवित आहे की, आपली महापालिका दि. २८/०२/२००२ रोजी स्थापन होऊन दि. ११/०८/२००२ रोजी या ठिकाणी लोकनियुक्त समिती कार्यरत झाली आहे. सदर समितीच्या कार्यक्रमामध्ये महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती स्थापण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे हे सभागृह खालील ९ सदस्यांची महिला व बालकल्याण समिती स्थापन करत आहे. जयाबाई य. भोईर, निर्मला सावळे, ज्युडी डिसोझा, जेन्वी आल्मेडा, मुक्ता रांजणकर, उमा सपार, प्रभात पाटील, शुभांगी नाईक, नयना म्हात्रे. तसेच सदर समितीस कायद्यान्वये जे अधिकार देणे आहेत ते अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत. सुचक श्री. हॅरल बोर्जीस, अनुमोदन श्री. चंद्रकांत वैती.

**रिटा शाह :-**

ठराव होण्या अगोदर सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी नगरसेवकांची नावे डिक्लेअर केली आहेत. ती कोणत्या पध्दतीने डिक्लेअर केली आहेत. हया ज्या ठरावाचे वाचन केलेले आहे. त्याला माझे अनुमोदन आहे. फक्त ज्या नगरसेवकांची नावे आपण सुचविली आहेत. त्याच्यामध्ये माझी इच्छा नाही पण अपेक्षा आहे की, ही जी नावे कोणत्या पध्दतीने समाविष्ट केली आहेत.

**प्रभात पाटील :-**

माझे नाव काढून टाकावे. कारण माझी परमिशन घेतली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर्वप्रथम ज्यावेळी हा ठराव आला. तेव्हा महापौरांनी निर्णय घ्यावा. त्यास आमची मंजुरी आहे. हे अधिकार आपल्याला दिलेले आहेत आणि असे असताना आपण ज्या पध्दतीने हा ठराव मांडला गेला आहे. तो चुकीचा असून त्यात आपला हा अपमान आहे.

**मोहन पाटील :-**

महापौरांचा अपमान कसा? काहीतरी आपण कसे काय बोलता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता जेव्हा एक सभासद या ठिकाणी बोलला याचा अर्थ आपल्याला विश्वासात न घेता हा ठराव मांडला गेला. हा सभागृहाचा अपमान आहे. सर्व गटनेत्यांची सभा बोलवावी. महिलांची सभा घ्यावी व त्यानंतर निर्णय घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

महिलांची सभा महापौरांनी घ्यायची असे ठरले होते.

**लिओ कोलासो :-**

महिला बालकल्याण समिती स्थापन करण्याच्या ह्या पध्दतीचा यापूर्वी ठराव दिलेला होता. महापौरांनी ही समिती गठन करुन जाहिर करावी असे मागच्या सभेत मत व्यक्त केले होते. तेव्हा हा विषय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यावर सर्व गटनेत्यांच्या कामकाजाची सभा महासभेपूर्वी होत असते. सभेच्या कामकाजापूर्वी एक-दोन दिवस आम्ही बसतो. त्यावेळी विषय ठेवण्यात आला होता

की, सभागृहाच्या निरनिराळया पक्षाचे त्या त्या संख्येत सभासद आहेत आणि त्या सभासदाच्या प्रमाणात आपण त्या त्या पक्षाच्या महिला भगिनीना या समितीवर प्रतिनिधीत्व द्यायचे परंतु हा जो फॉर्म्युला मांडण्यात आला. तो फॉर्म्युला उपस्थित सदस्यांना मान्य न झाल्यामुळे ह्या प्रस्तावाबाबत या ठिकाणी सत्ताधारी पक्षांनी अशी भुमिका घेतली की, सत्ताधारी पक्षाचे चार, कॉंग्रेसचे तीन सदस्य घ्यायचे, जनता दलाचा एक सदस्य घ्यायचा, आणि शिवसेनेचा एक सदस्य घ्यायचा.

**प्रभात पाटील :-**

आम्हाला आनंद आहे. या देशाचा इतिहास असा आहे की, महिला समितीचा ठराव पुरुषांनी मांडला आहे. त्याचा आक्षेप नाही. पण जे गटनेत्यांच्या सभेत झाले ते त्या सदस्यांना कळले पाहिजे होते.

**रिटा शहा :-**

फक्त प्रश्न एवढा आहे की, अनुमोदन दिले. तुम्ही प्रस्ताव आमच्याकडे आणल्यानंतर सन्मानित केले आहे. मागच्या मिटिंगमध्ये हा ठराव आला होता. तेव्हा असेच ठरले होते. महापौर मॅडमच्या अध्यक्षतेखाली सर्व महिला नगरसेवकांना घेउन समिती गठित करणार होते. हा महिलांचा अपमान आहे. महापौरांचा नाही. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनादेखील माहिती आहे की, आमच्या महापौर मॅडमदेखील एक महिला आहेत. हा अपमान महापौरांचा नाही किंवा नगरसेवकांचा पण नाही. हा डिसीजन आपण घ्यायचा. फक्त गोष्ट एवढी होती की, आपण सर्व पक्षाच्या नगरसेवकांना व महिलांना घेउन समिती गठित करायला पाहिजे होती.

**प्रभात पाटील :-**

मागच्या वेळी हे अधिकार मा. महापौर यांना दिलेले होते. पण आता चित्र वेगळे दिसते. समिती गठित करुन ती कन्फरमेशनसाठी महासभेत यायला पाहिजे. महापौरांनी जर आपल्याला अधिकार दिले तर महिला सदस्यांची सभा बोलावून एक कमिटी निश्चित करावी. तसा आदेश काढावा. आपण महापौर असल्याने तो सन्मान आपण घेउन त्यांच्या मान्यतेनुसार आपण कमिटी घोषित करावी असे माझे निवेदन आहे.

**लिओ कोलासो :-**

जी समिती नेमायची आहे. ती सभागृहाने नेमायची आहे. याला निवडणुकीची प्रोसीजर नाही असे सांगण्यात आले आहे. आयुक्त साहेब आपण याचा खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी सांगितले हे अधिकार दिले होते. ठराव मांडायचा प्रश्न नाही. हा आता पुन्हा आपण महापौरांना अधिकार दिलेला आहे. महिलांची सभा बोलावून महासभेत जाहिर करावे. पण आपण अधिकार सभागृहाला देतो.

**प्रभात पाटील :-**

माझा गटनेत्यांशी संबंध नाही. सर्व गटनेते इथे आलेले आहेत. महिला बालकल्याण हा एक चांगला विषय होता. तुमच्या ध्यानात येईल असे नाही. मी म्हणते एकही गटनेत्याबरोबर आपल्या पक्षाचे एकही महिला नगरसेविका नव्हती.

**रिटा शहा:-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी जे वक्तव्य केले. त्याच्याशी मी सहमत आहे. इतर महानगरपालिकेच्या विषयावर आपण चर्चा करतो. गटनेत्यांना माहिती पडले म्हणजे सर्व सदस्यांना माहिती पडले असे नाही. महिला बालकल्याण समिती गठित करायची होती. तेव्हा सर्व महिलांना विश्वासात घेउन ही समिती गठित करायची होती. गटनेत्यांनीच समिती गठित केली ते आम्ही मान्य करतो. महिला बालकल्याणमध्ये जी नावे दिलेली आहेत. ती आम्हाला मान्य आहेत. सर्व महिलांना बोलवा नंतर नाव डिक्लेअर करा.

**प्रभात पाटील :-**

माझे नाव कमी करा.

**जयंत पाटील :-**

आमच्या पक्षाने जे आदेश दिले ते आम्हाला मान्य आहेत.

**रिटा शहा :-**

पक्षाच्या आदेशाचा प्रश्न येत नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी ठराव मांडलेला आहे. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी अनुमोदन दिलेले आहे. तसा ठराव आम्ही दिलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आता सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी वक्तव्य केले. गटनेत्यांच्या सभेत असे असे झाले. त्यात असे ठरले होते की, आपण ११ सदस्यांची समिती गठित करायची नंतर ९ सदस्यांची समिती करायची त्यात एन.सी.पी.चे तीन आघाडीला एक, जनता दलला एक असे ठरले. परंतु, तशी नेमणूक झाली नव्हती. आपण पीठासीन अधिकारी होते. जेव्हा आपण मिटींगला बोलावता तेव्हा आम्ही आपला सन्मान ठेवून मिटिंगला येतो. कृपया आपण समिती गठन केलेली आहे. तेव्हा आमच्या नगरसेवकांची नावे घेतली नव्हती. फक्त हक्क आपल्याला दिलेला होता. आपण घोषित करायला पाहिजे होते. आमच्या नगरसेवकांना बोलावले नव्हते. तरी याच्यावर विचार करावा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो आपण सत्ताधारी पक्षाच्या संख्येच्या जोरावर आपण बोलता. महापौर मॅडम बोलतात या संधीचा फायदा घ्यायचा किती घ्यायचा ते लक्षात ठेवा. महापौर मॅडम आम्ही तुमचा आदर करतो. तसेच, या सभागृहातील सभागृहनेते यांचादेखील आम्ही आदर करतो. पण ते अज्ञानी आहेत. ते जे काही बोलतात ते त्यांनी सत्य बोलावे. या सभागृहातील सर्व नगरसेवकांना, अधिका-यांना माहिती आहे ते किती खोटे बोलतात. आपण साक्षीदार आहात. ते विविध विषयावर चर्चा करण्यासाठी आले होते. आम्ही पुन्हा बोलतो पुन्हा बोलण्याची अपेक्षा नाही. त्यांनी त्यांच्या कार्यपध्दतीने चालावे. त्यांना या गोष्टीतील काही माहिती नाही.

**आसिफ पटेल :-**

तुम्ही आता जे बोलले, ते तुमचे शब्द मागे घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांच्याबद्दल सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी अनुद्‌गार काढले. तर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपले वक्तव्य चुकीचे आहे. आपण ते मागे घ्या.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सरस्वतीचे संस्थापक म्हणून उल्लेख केला. त्या सरस्वती मंदिराकडे जाणारा रस्ता आमच्याच लोकांनी मोकळा करुन दिलेला आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आप कॉलेज चलाते है। सरस्वती की पुजा करते है। आपको यह शोभा नही देता है। आपने अभी जो शब्द बोले वो गलत है। आपने ऐसा नही बोलना चाहिए था। आप अपने शब्द सुधारिए।

**रोहिदास पाटील :-**

आप क्या बोलते है। आपको समझता है क्या? तुम्हारे बाप का राज है क्या? कानाखाली मारीन.

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण माघार घ्या. काकांची जबाबदारी काय असते माहिती आहे का?

**स्टिवन मेंडोसा :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण हातवारे करुन काय बोलता? आमचे हात पण तयार आहेत.

**(सभागृहात गोंधळ)**

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, जसे १३ वर आपण गेलो १५ वर सल्ला देणारे आपले माळी साहेब आले. माळी साहेबांनी सांगितले यामध्ये ९ सदस्य घ्यायचे आहेत. मी सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांना बोललो की, हे बघा प्रकरण होते तर तुम्ही तयारी करुन तर यायला पाहिजे होते. ते मी तुम्हाला सांगतो की, त्यांनी काही तयारी केली नव्हती. माळी साहेबांनी सांगितल्यानंतर तुम्ही सांगितले की, चला किती किती सांगा. आताही खेळाचे वातावरण पण उगाच उलटेसुलटे होते. खेळीमेळीचे वातावरण होते. एन.सी.पी. च्या तीन, आयच्या दोन, मी सांगितले भाजपाच्या दोन, तुम्ही सांगितले भाजपा, शिवसेनेच्या दोन, मी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांना सांगितले एक तीनास एक

मिळते.  आमचे पंधरा सदस्य आहेत. आम्हाला दोन पाहिजे.  योग्य तो निर्णय तुम्ही घ्यावा. कारण आपल्या पहिल्या महासभेत आपल्या गटनेत्यांच्या बैठकीत ठरले नव्हते. पहिल्या महासभेत ठरले होते की, महापौरांनी चर्चा करुन याच्यावर निर्णय घ्यावा आणि ती आपली बैठक झाल्यानंतर आपण निर्णय घ्या असे सांगुन मी उठुन गेलो.  मी माझे पत्र दिले.  मी, सन्मा. सदस्या रक्षा शाह आणि सन्मा. सदस्य भवरीकुंवर ही दोन नावे तुम्हाला दिली.  तुम्ही आता वाचले.  त्यात एकही नाव नाही.  काय आहे?  ही कपट नीती नाही तर काय?  आता कपट बोलले तरी कोणाला तरी झोप येईल.  हे सभागृह आहे की नुसते बैठकीचे ठिकाण आहे की, ते व्यक्तिगत बैठक समजतात.  या व्यासपीठाचा या सभागृहात आणखी ऐकणाऱ्यांचा मान वगैरे आहे की नाही.  एवढयासाठी बोलणार आहोत आणि जर असे पुन्हा पुन्हा वाटत असेल की, आपण काहीतरी संख्या बळावर करतो.  आम्हाला त्यात नवीन काही वाटत नाही.  तुम्ही आता सांगितले महिला बालकल्याणमध्ये आम्ही तुम्हाला या सभागृहात पावर दिलेली आहे.  तुमच्या सद्‌विवेक बुद्धीला जर पटलं की, भाजपाच्या एकही महिलेला तुमच्या महिला बालकल्याणमध्ये घ्यायचे नाही.  तोही निर्णय आम्हाला मान्य करायला लागेल.  नाही मागायचे तर आम्ही कुठेतरी मागु.  पण एक पद्धत काय आहे?  जेव्हा तुम्ही सांगणार की, गटांच्या बैठकीत एक ठरते.  तुम्ही एकदम मोकळ्या मनाने सांगणार आणि तुम्हांला सल्ला देणारे जर असे कुठेतरी तीर मारत असतील तर म्हणायचे काय? म्हणून मी तुम्हाला विनंती करतो, या सभागृहातीलच कामकाजासाठी नाही, मिरा भाईंदरच्या भल्यासाठी आपणही संबंधितांचा सल्ला कितपत घ्यायचा तो तुम्ही ठरवा. आमचा अधिकार नाही. आमची फक्त विनंती आहे. पण या सभागृहात तुम्ही आता जर सांगितले की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आता तुम्ही बसा. आम्ही जी नावे केली ती फायनल आहेत. भाजपाच्या एकही सदस्याला आम्ही त्याच्यामध्ये स्थान दिलेले नाही. हेतुपुरस्पर दिलेले नाही किंवा तुम्ही जर आता सांगितले की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील सांगितलेच नाही. ते चुकुन राहिले आहे. तर मग पुढचे बघु या किंवा पुढच्या सभेत घेऊ सांगितले पण आम्ही तुम्हाला मनापासुन आम्ही खोटे बोलत नाही. आम्ही मनापासुन तुम्हाला मान देतो. आणि जोपर्यंत आमची इच्छा आहे किंवा आम्हाला पटलय की, महापौरांना आपण मान दयायचा. तोपर्यंत मी आटोकाट मान दयायचा प्रयत्न करणार. आणि भांडायच असेल त्या दिवशी सांगु या. आम्ही भांडायच्या तयारीत आहोत. तुम्ही तुमच्या पद्धतीने चला. पण ही पद्धत नाही की, भाजपाच्या एकही सदस्याचे त्याच्यामध्ये नाव नाही. आणि तरीही आम्ही मेजोरिटीवर हा हु करुन सभागृह चालवितो. अशा पद्धतीचे वातावरण असेल मग कशासाठी बोलायचे आहे, कोणासाठी बोलतो.  त्याच्यामध्ये काही व्यक्तिगत स्वार्थ आहे का?  ती कोणती समिती आहे?  महिला बालकल्याण समिती आहे.  तुम्हाला दिलेल्या अधिकारावरुन तुम्ही त्याच्यावर योग्य निर्णय घेणार ही तुमची कसोटी होती.  तुम्ही ज्यांच्यावर विसंबुन राहिलात ते तेवढे

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, महिला बालकल्याण समितीचा महत्त्वाचा विषय जवळ-जवळ सभागृह अस्तित्त्वात आल्यापासुन म्हणजेच १७, १८ महिन्यानंतर आपल्या पालिकेच्या पटलावर रितसर येत आहे.  या विषयावर बरीचशी चर्चा, आरोप, प्रत्यारोप झाले.  सभागृहामध्ये काका मला वाचवा तशी सुद्धा परिस्थिती आहे.  परंतु ते काका तसे नाही आहेत.  हे आता काही महिला सदस्यांनी पण याच्यावर वक्तव्य केले की, गटनेत्यांच्याबरोबर काही महिला सदस्या नव्हत्या.  आपल्या महापालिकेमध्ये गटनेत्यांमध्ये एक महिला असती तर जरा बरे झाले असते असे मला वाटते.  पण ती नाही आहे हे दुर्देव आहे.  यापुर्वी मागच्या सभेतच आपल्या सन्मा. महापौर मॅडमना पण आपण संपुर्णपणे पॉवर्स दिल्या होत्या, अधिकार दिले होते. हे सुद्धा बऱ्याचशा वक्त्यांकडुन आता वक्तव्य झालेले आहे.  परवाच्या गटनेत्यांच्या सभेमध्ये जेव्हा आम्ही सर्व गटनेते त्या सभेला गेलो त्यावेळेला महापौरांनीच आम्हाला सांगितले की, आपण आता या गटनेत्यांमध्ये काहीतरी एक ठरविले पाहिजे. महिला बालकल्याण समिती या अगोदर फार पूर्वी व्हायला पाहिजे होती.  या शहरातील महिला त्या सर्व घटकातील, सर्व प्रकारच्या म्हणजे गरीब, त्याहुन गरीब आणि बालकं यांच्या हिताचा जर विचार करायचा असेल तर वैधानिक दृष्टीकोनातुन ही समिती लवकरांत लवकर गठित झाली पाहिजे होती. त्याच्यामध्ये कोण सदस्य आहेत.  ते महत्त्वाचे नाही आहे.  ती समिती लवकरांत लवकर कार्यान्वीत होणे हे महत्त्वाचे होते.  ही सर्व परिस्थिती महापौरांनी त्या गटनेत्यांच्या सभेमध्ये उपस्थित केल्यानंतर मघाशी जो अज्ञानाचा विषय इकडे आला. मला असे स्वतःला वाटते की, आपण सर्व नगरसेवक या महापालिकेच्या कामकाजात नवीन आहोत.  सर्वात आधी महापालिका प्रांतिक अधिनियम १९४९ हा आपण सगळ्यांनी घोळून प्यायलेला आहे असे कोणी समजु नये. बारिक बारिक तरतुदी आहेत. त्या अधिकाऱ्यांना अनेक वर्षे सर्व्हिस करुनसुद्धा काही कळत नाहीत. कळुन येत नाहीत. त्याला ते आपण

अज्ञान पण म्हणू नये. जेव्हा त्या सदस्य संख्येचा प्रश्न आला. त्यावेळेला प्रशासनाच्यावतीने किंवा आम्हा गटनेत्यांच्या वतीने आम्ही एक गणित मांडले गेले. सर्व प्रथम सर्व पक्षाच्या प्रत्येक नगरसेवकाला नगरसेविकेला त्याच्यामध्ये स्थान असले पाहिजे. म्हणजे त्या पक्षाला सदस्य संख्या म्हणजे नंतर ती काढता काढता नऊ, पंधरा अशी गणित मांडत गेले. नंतर या नियमावलीमध्ये नऊ सदस्य संख्या असावी असे आपल्या महानगरपालिकेच्या या नियमावलीमध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे ती सदस्य संख्या, पंधरा, अकरा वरुन नऊवर आली. आता नऊमध्ये मग कोण कोण घ्यावे? जर सत्ताधाऱ्यांनी ठरविले तर आम्हाला कोणालाच ते एकही देऊ शकत नाही. अगदी स्पष्ट आहे. त्यांनी ठराव करुन टाकला की, आम्हाला नऊच्या नऊ पक्षाचे असतील बाकी आम्ही कोणाला देणार नाही. तर त्यामध्ये मी स्पष्ट ठणकावुन सांगितले. आज आपले विरोधी पक्ष नेते परशुराम पाटील नाही आहेत. त्यांनी सुचना मांडली की, काही आपण पुढच्या वर्षात ॲडजेस्ट करु. म्हटल नाही. पहिले वर्ष आहे. सगळ्या पक्षांना आपण याच्यामध्ये प्राधान्य दिले पाहिजे आणि ते तुम्हाला द्यावे लागेल. त्यानुसार सर्व पक्षाचा एक-एक म्हणजे एन.सी.पी., काँग्रेस (आय) आणि बाकीच्या राहिलेल्या सर्व पक्षांना एक-एक असे आमचे ठरले. परंतु, त्याच्यातील काही गटनेत्यांनी त्याच्यामध्ये अट्टाहास केला की नाही आमचे तीनच पाहिजेत, आमचे दोनच पाहिजेत. त्यामुळे मग महापौरांना नाईलाज झाला आणि मग हा विषय आपण कुठलाही निर्णय न घेता तो स्थगित करण्यांत आला आणि त्यामुळे आज हा सभागृहापुढे आला आहे. पण काही ठिकाणी आता सदस्यांनी, ज्येष्ठ सदस्यांनी पण सांगितले की, मतदानाची पद्धत याच्यामध्ये मतदानाची काहीच पद्धत नाही आहे. महापालिकेचा सभागृह जो ठराव पास करेल तो मान्य असे या उपविधीमध्ये दिलेले आहे. उपविधीची कॉपी माझ्याकडे आहे आणि याच्यात खरोखर आम्हालाही काही माहिती नव्हते की, निवडणुक पद्धती आहे का? कारण या सगळ्या समित्या नवीन बनतात. याची कार्यपद्धती आपल्याला आता सुरु करायची आहे. तर माझी सगळ्या सभागृहाला अशी विनंती आहे, आम्हाला आपण एक सीट दयाल. नाही द्याल. त्याच्याबद्दल मला कॉन्ट्राव्हर्सीमध्ये जायचे नाही. दिली नाही तरी चालेल. दिली तरी चालेल. पण या शहराला जे पंधरा ते सोळा महिन्यापासुन आपण महिला बालकल्याण समितीच्या सर्व अधिकारातुन जी मिळणारी कामे आणि सोयी आणि महिलांकरीता खास करुन मिळणारे सर्व प्रकारचे फायदे यापासुन जे या महापालिकेने वंचित ठेवले आहे. म्हणजे मघाशी हाही उल्लेख केला गेला की, महापौरांचा अपमान आहे. पण या महापौर आपल्या महिला असुनसुद्धा मिरा भाईंदर महानगरपालिकेची महिला आणि बालकल्याण समिती जी पहिल्या किंवा दुसऱ्या महिन्यात गठित व्हायला पाहिजे होती. ती जवळ जवळ सतरा महिने झाली नाही. हा पण एक फार मोठा अपमान आहे असे मी स्वतः समजतो. कारण आपल्या महापौर महिला आहे. पण महिला बालकल्याण समितीच नाही आहे. हा मोठा या शहराचा विनोद आहे. असे मला स्वतःला वाटते. मागच्या वेळेला जेव्हा हा विषय आला त्याचवेळेला खरे बघायला गेलो तर सभागृहामध्ये हा विषय निर्णयास लागुन गेला पाहिजे होता की, समिती झाली आणि त्या त्या वेळेला त्या त्या सदस्यांची नावे मागविली होती. आमच्या सदस्यांचे देखील नाव आम्ही त्यावेळेला देऊन टाकले होते आणि हा फक्त एक प्रोसेस बाकी होता. इलेक्शन प्रोसेस यामध्ये नाही आहे. साधा ठराव घ्यायचा होता. त्या गटनेत्यांच्या सभेत साधक बाधक चर्चा झाली. कोणावरही अन्याय केला गेला नाही, असे मला तरी वाटते. सभागृहात सगळ्यांना सांगितले होते की, तुमची एक-एक कोण तरी नावे द्या. इन्टरनल तुमचा लुक आऊट आहे. कोणाला पाठवायचा आहे. ते सिनियॉरिटीने प्रत्येकाने ठरवायचे की, आमच्याकडे ही सिनियॉरिटी आहे. या ज्येष्ठ नगरसेविका आहेत. त्यांना आम्ही पाठवु. ते प्रत्येक गटनेत्यांनी ठरवायचे असते. मघाशी काही महिला नगरसेविकादेखील बोलल्या की, गटनेते आम्हाला कळवत नाहीत. काय असते तो प्रत्येकाचा अंतर्गत भाग आहे. काही सदस्यांनी पण गटनेत्यांना भेटुन विचारले पाहिजे की, कालच्या गटनेत्यांच्या सभेत काय झाले? त्यामुळे काही बऱ्याचशा गोष्टी कळु शकतात. मी सभागृहाला विनंती करतो, परत एकदा सांगतो, आम्हाला हे पद नाही दिले तरी चालेल. पण ही महिला बालकल्याण समिती लवकरांत लवकर गठित करा. तिचे काम लवकरांत लवकर सुरु झाले पाहिजे. या शहरातील सर्व महिलांना आणि बालकांना आपल्या महापालिकेच्या निधीमधील महत्त्वाचा असा जो फायदा झाला पाहिजे. जो आजपर्यंत वंचित राहिलेला आहे आणि या फायद्यापासुन गेल्या सतरा महिन्यापासुन वंचित आहे. हे अधिक वंचित राहु नये म्हणुन सभागृहाने लवकरांत लवकर निर्णय घ्यावा. अशी महापौर आपल्याला माझी नम्र विनंती आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, महापौर साहेबा मला वाटते गटनेत्यांच्या सभेत जी काही सखोल चर्चा झाली. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी संपुर्ण परिस्थिती सभागृहाच्यासमोर

आणली. त्याबद्दल सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांना लाख लाख धन्यवाद. इथे मी जी नऊ सन्मा. नगरसेवकांची जी नावे घोषित केलेली होती. त्याच्यामध्ये सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यांची स्वतःची या समितीवर रहायची इच्छा नाही तर त्यांच्या अनुमतीने सन्मा. सदस्या शानु गोहिल यांचे नाव इथे घोषित केलेले आहे. त्याचप्रमाणे दुसरी एक दुरुस्ती अशी आहे. मी जो ठराव दिलेला होता. त्याच्यामध्ये एक ॲडीशनल असे करायचे होते की, सदर समितीचा कार्यकाल एक वर्षाचा राहिल.

**मोहन पाटील :-**

या दुरूस्तीस माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आता असे आहे की, ठरावाने झाला की, तुम्हाला त्यावेळी दिलेल्या अधिकारात केले. सभागृहाच्या कामकाजाच्या नियमानुसार आमच्या दृष्टीने ठरावाची आवश्यकताच नाही. हा महापौरांनी वाचुन दाखवायचा आहे आणि लिहुन घ्यायचा आहे. पुढचे बोलायचेच नाही. यांचे अनुमोदन, सुचक कशासाठी? ज्या महिलांना प्राधान्य दिले ते ह्यांनी दिले असे दाखवायचे आहे का? काही गरज नाही.

**मा. महापौर :-**

सचिवांनी ठराव वाचुन दाखववावा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, तुमच्या अधिकारात नावे वाचायची आहेत. ठराव नाही.

**प्र. सचिव :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, महापौरांनी सुचविलेली नावे वाचुन दाखवतो.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ६७ वर जो ठराव दिलेला आहे. त्याला अनुमती झालेली आहे. त्या ठरावाचे तुम्ही वाचन करा आणि सभागृहात तशी नावे तुम्ही घोषीत करा.

**रोहिदास पाटील :-**

मी पुर्ण आग्रह धरतो आयुक्त साहेब तुम्ही याच्यावर मॅडमना सल्ला द्या की, एकदा या पुर्ण सभागृहाने बिनविरोध कोणत्याही बहुमताने नाही. एकमताने त्यांना अधिकार दिला होता. ही समिती तुम्ही गठित करा. त्यामुळे एक ठराव आणि प्रक्रिया कशासाठी याला माझे स्पष्ट ऑब्जेक्शन आहे. ही कामाची पद्धत नाही. मॅडम, तुम्हाला जी नावे आवडली. महापौर म्हणुन तुम्ही वाचुन दाखवा. ठराव येणारच नाही.

**प्र. सचिव :-**

सुचक सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस. अनुमोदक सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांचा आलेला ठराव आहे. आपली महापालिका २८/०२/०२ रोजी स्थापन होऊन दिनांक ११/८/०२ रोजी या ठिकाणी लोकनियुक्त समिती कार्यान्वीत झाली असुन सदर समिती महापालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती स्थापन्याचे प्रावधान आहे. त्यामुळे हे सभागृह एकुण ९ सदस्यांची महिला व बालकल्याण समिती स्थापन करित आहे. सदस्यांची नावे जयाबाई भोईर, निर्मला सावळे, ज्युडी डिसुझा, जेन्वी आल्मेडा, मुक्ता रांजणकर, उमा सपार, शानु गोहिल, शुभांगी नाईक, नयना म्हात्रे तसेच सदर समितीस कायद्याने जे अधिकार देणे आहेत. जे अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत. तसेच, या समितीचा कालावधी एक वर्षाचा असेल.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, मी या सभागृहात तुम्हाला सांगतो की, ज्या पद्धतीने तुम्ही भारतीय जनता पार्टीची नावे वगळली आहेत. कारण अधिकार दिल्यानंतर तुम्ही केल्यानंतर आमचे जे होते ते पूर्ण या सभागृहामध्ये

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर साहेबा, गटनेत्यांच्या सभेत क्लिअर डिस्कशन झालेले होते. प्रत्येक गटनेत्यांना तुम्ही त्या त्या प्रकारचा अधिकार दिलेला होता. परंतु, एखाद्या गटनेत्यांनी वाजवीपेक्षा जास्त नावे दिली. त्यामुळे त्याच्यावर कुठेही एकमत होऊ शकले नाही. म्हणुनच शेवटी तुम्हाला तुमच्या अधिकारामध्ये हा निर्णय जाहिर करावा लागला.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला त्यामध्ये काही वावगे वाटण्याचे कारण नाही. आम्ही तर पहिल्यांदाच रुलिंग दयावे बोललो आहे की, त्यांनी दिलेला निर्णय म्हणजे तुमची जी निर्णय प्रक्रिया आहे ती ज्या पद्धतीने तुम्ही केलेली आहे. त्याचे आम्ही भारतीय जनता पार्टीने याचा निषेध व्यक्त केला. तुम्ही ठराव झाला असे समजुन घ्या.

**आसिफ शेख :-**

महापौरांच्या आदेशाने, सचिवसाहेबांनी एका ठरावाचे वाचन केलेले आहे. आपण त्याला मान्यता दिलेली आहे आणि हा ठराव कायम झालेला आहे. आता पुढचा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, माझी अशी एक सुचना आहे की, आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. हा जो ठराव झाला आहे. कायम करुन घेतला आहे का? आणि त्याच्या त्या पहिल्या सभेची आपण लवकरांत लवकर घोषणा करावी.

**मा. महापौर :-**

करण्यांत येईल.

**प्रकरण क्र. ६७ :-**

**विषय :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती स्थापन करणे व सदर समितीस अधिकार प्रदान करण्याबाबत (दि.१८/०९/२००३ रोजीचे तहकूब प्रकरण क्र.३५.)**

**ठराव क्र. ५८ :-** आपली महापालिका दि. २८/०२/२००२ रोजी स्थापन होउन दि. ११/०८/२००२ रोजी या ठिकाणी लोकनियुक्त समिती कार्यरत झाली आहे. सदर समितीच्या कार्यक्रमामध्ये महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती स्थापन्याचे प्रावधान आहे. त्यामुळे हे सभागृह खालील एकूण ९ सदस्यांची महिला व बालकल्याण समिती स्थापन करीत आहे.

१. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. जयाबाई य. भोईर
२. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. निर्मला सावळे
३. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा
४. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. जेन्वी यु. आल्मेडा
५. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. मुक्ता रांजणकर
६. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. उमा सपार
७. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. शानु गोहिल
८. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. शुभांगी नाईक
९. सन्माननिय नगरसेविका - सौ / श्रीम. नयना म्हात्रे

तसेच सदर समितीस कायदयान्वये जे अधिकार देणे आहेत ते अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच या समितीचा कार्यकाल एक वर्षाचा असेल.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

प्रकरण ६६ मागे ठेवलेले प्रकरण पुन्हा मी सभागृहात आणतो. शहाड टेमघर प्राधिकरणांस कायदेशिर दर्जा निश्चित करणेबाबत व प्राधिकरणास कायदेशीर स्वरुप देणेबाबत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया आणि सन्मा. सदस्य या ठिकाणी प्रकरण ६६ नुसार शहाड टेमघर पाणीपुरवठा प्राधीकरणाचा कायदेशीर दर्जा निश्चित करणे व प्राधीकरणाला कायदेशीर स्वरुप देणे. या

करेल. राज्यशासनसुध्दा आपला एक नामनिर्देशित संचालक नियुक्त करेल. संचालक मंडळ तांत्रिक, वित्तीय आणि लेखा परिक्षा/चार्टर्ड अकाउन्टन्टसी क्षेत्रामधील तज्ञ असे दोन उर्वरित स्वतंत्र संचालक नेमणूक करतील. तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका आपले दोन सदस्य सदर शिखर समिती व संचालक मंडळ सभासद म्हणून नेमणूक करील. ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त संचालक मंडळाचे अध्यक्ष असतील. संचालक मंडळ दैनंदिन कार्याची जबाबदारी कार्यकारी संचालक व कर्मचा-यांवर सोपवेल जे कार्पोरेट गर्व्हनर्सच्या तत्वावर आधारित असेल. व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशनमध्ये ठराविक महत्वाचे निर्णय केवळ संचालक मंडळाच्या आणि भागभांडवलाच्या पूर्वपरवानगीने घेता येतील. अशी तरतुद करण्यात यावी. एक स्वतंत्र पूर्ण वेळ कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक असतील व ते संचालक मंडळाचे सचिव राहतील. संचालक मंडळाची रचना भारतीय कंपनी कायदा १९५६ आणि तद्संबंधीचे वेळोवेळीच्या कायदयाच्या तरतुदीप्रमाणे वेळोवेळी ठरविण्यात/करण्यात येतील. (३) स्टेम प्राधिकरणाच्या कार्याच्या व्याप्तीची वाढ व पुर्नरचना करुन त्यात अस्तित्वात असलेल्या व्यक्तिसह खालील बाबींचा समावेश करुन सेवेची व्याप्ती वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. (अ) उद्योग मोठया प्रमाणावर व्यापार करणा-या संस्थांना थेट पाणी विक्री करणे. (ब) इतर प्रदेशात पर्यावरण, मुलभूत सेवा इत्यादी कार्य करणे, स्पर्धेत उतरणे, नजीकच्या भविष्यकाळात प्रदेश व राज्य मध्यम तसेच दीर्घकालीन प्रकल्प आखणे, राबविणे. परिचलन करणे. देशात व परदेशातही कार्य करणे. (क) पर्यावरण किंवा मुलभूत सुविधा, पाणीपुरवठा वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा योजना प्रकल्प, मलःनिसारण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी सेवांबाबत संयोगी आणि अन्य इतर कोणत्याही स्थानिक संस्थाशी करार करण व ते प्रकल्प राबविणे. परिचलन करणे आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत विकसित करणे, धरण बांधणे इत्यादी (ड) कन्स्ल्टन्सी सुविधा पुरविणे, देणे इत्यादी (४) सध्या स्टेम प्राधिकरणाकडे जे क्षेत्रीय कर्मचारी एकूण ७१ आणि कार्यालयीन कर्मचारी/अधिकारी एकूण १८ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रतिनियुक्तांवर कार्यरत आहेत. त्यांना कंपनीच्या स्थापनेनंतर दोन वर्षाच्या कालावधीनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्ती घेउन कंपनीचे कायम कर्मचारी म्हणून राहावे किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सेवा स्टेमकडे कायमची वर्ग करुन परमनन्ट ॲबसॉप्शन स्टेम कंपनीचे कायम कर्मचारी म्हणून राहावे अथवा त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे परत जावे हे पर्याय देण्यात यावेत. या प्रारंभिक दोन वर्षाच्या कालावधीत कर्मचा-यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडिल पदावर हक्क, लाच, सेवा व शर्तीचे संपूर्ण संरक्षण करण्यात येईल. याबाबत सध्या कार्यरत असलेल्या क्षेत्रीय कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी यांचेबाबत उक्तप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यास तसेच चार वर्षाच्या पुढिल कालावधीसाठी प्रतिनियुक्ती कालावधी वाढवून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसा प्रस्ताव मा. अध्यक्ष कार्यकारी समिती स्टेम पाणीपुरवठा प्राधिकरण यांनी शासनाकडे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे. कायदेशीर दर्जा ठरविण्यासाठी प्रथम शासनास प्रस्ताव पाठवून मंजुरी मिळविणे मालमत्ता व दायित्वाची किंमत, रकमा ठरविणे व कंपनी कायदयाखाली नोंदणी प्रस्ताव सादर करणे यासाठी येणा-या खर्चास मंजुरी देणे, कंपनीच्या व्याप्ती, संरचना, अधिकारी नियमावली, कर्तव्य इत्यादीचा सविस्तर प्रस्ताव तयार करणे अशी पुढिल कारवाई करण्यास कार्यकारी समिती शहाड टेमघर आणि पाणीपुरवठा प्राधिकरण प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (६) सध्या शहाड टेमघर पाणीपुरवठाशी निगडित काही देणी व वाद आहेत. त्यांची वाद/देणी यादी सोबत जोडपत्र एक मध्ये दिली आहेत. सर्वसाधारणपणे देण्यामध्ये प्रलंबित प्रकरणे, वित्तिय देणी आणि कर्मचा-यांची प्रकरणे आहेत. जोडपत्र एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनुक्रमांक ३,४ व ६ नवीन संस्था, स्टेम ॲथॉरिटी देणी आपल्यावर घेईल. त्या शिवाय स्थानिक संस्थानी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने व राज्यशासनाने दिनांक २९/०२/२००० पूर्वी केलेल्या कारवाईमुळे काही नवीन वाद/देणी उदभवल्यास त्याची जबाबदारी तिन्ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषद ठाणे यांच्यावर ग्रामीण भागाविषयी राहिल व ही जबाबदारी कंपनीची राहणार नाही. वरील अनुक्रमांक १ ते ६ प्रमाणे मान्यता देण्यात येत असुन त्याप्रमाणे आवश्यक ती पुढिल सर्व कार्यवाही करण्याकरिता अध्यक्ष व कार्यकारी समिती, शहाड टेमघर पाणीपुरवठा प्राधिकरण आयुक्त सो. महानगरपालिका ठाणे यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

म्हणजे आम्ही सगळे सन्मा. नगरसेवक जी काही सुचना दिली ती सगळी आपण लक्षात घेणार नाही का? ॲज इट इज मंजुर का करता? आपण आपल्या भाषणामध्येच सर्व नगरसेवकांचे नाव घेउन बोललात.

**आसिफ शेख :-**

जे ठरावाचे वाचन केले. त्यामध्ये सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्या सुचनाची पण नोंद घेउन त्याप्रमाणे कारवाई करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

तशी शिफारस करा. आम्ही जे काही बोललो त्यावर लिगल एन्टीटी काय आहे? कायदा काय म्हणतो? त्याच्यावर अभ्यास करुन मग शासनाला प्रस्ताव पाठवा.

**आसिफ शेख :-**

शिफारस केली आहे

**रोहित सुवर्णा :-**

नाही. आपण शिफारस करा मला वाटते मंजुर आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, सन्मा.सदस्य चंद्रकांत वैती, सन्मा. सदस्य मिलन पाटील, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि सन्मा. सदस्य रतन कृष्णा पाटील या सर्व सन्मा. विद्वान सदस्यांनी ज्या ज्या या ठिकाणी सुचना केलेल्या आहेत त्या संपूर्ण सुचनांची यामध्ये नोंद घेउन त्याप्रमाणे ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मांडलेला आहे त्यास अनुमोदन दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब तुम्ही आता जी काही सुचना केली की आपल्या महापालिकेलासुध्दा प्रतिनिधीत्व एक वर्ष त्याचे अध्यक्षपद मिळावे हयात तुम्ही कुठे बोललात?

**मा. आयुक्त :-**

ते आपण सुचनेमध्ये घेउ.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता मघाशी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यानी ठराव मांडला त्यांनी अनुमोदन दिले एक ठराव झाला आता परत दुसरा ठराव यांनी मांडला.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी व्यवस्थित मुददा उपस्थित केला मी मागेपण सांगितलेले की बोलताना बोललो की जसा पहिला मान आपण ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांना पहिल्या वर्षी देउ दुसऱ्या वर्षी ते आपल्याकडे यायला पाहिजेत. आणि तिसऱ्या वर्षी ते ठरावात आपण नमुद करुन घेउ

**प्रफुल्ल पाटील :-**

नक्की काय ठराव आहे? म्हणजे मघाशी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मांडलेला ठराव आहे. याला अनुमोदन सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी दिले

**आसिफ शेख :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचनांची नोंद करुन हा ठराव आहे जशा त्यांनी सुचना मांडल्या की पब्लीक इश्युमध्ये आपण रेस केले पाहिजे भाग भांडवल तयार केले पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांनी मघाशी ज्या ठरावाला अनुमोदन दिले तो ठराव धरायचा की आता वाचला तो ठराव धरायचा. ठराव करण्याबददल आमचे काहीच ऑब्जेक्शन काही नाही आहे.

**आसिफ शेख :-**

ठराव जो सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मांडलेला आहे त्याचे फक्त वाचन करण्याचे काम मी ठिकाणी केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांनी सांगितलेला ठराव असा नव्हता.

**चंद्रकांत वैती :-**

या सभागृहासमोर मी ठराव ठेवला होता त्या ठरावाला सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी अनुमोदन दिले आणि आता जी आपल्या सर्व सदस्यांकडे ठरावाची टिपणी आहे या माहितीची ती टिपणी त्यांनी वाचली तर त्यासह त्या सुचना घेउन तो ठराव माझा आहे एकच ठराव घ्यावा. कारण सन्मा. सदस्य आसिफ शेख यानी वाचन केले त्याला कोणी अनुमोदन दिले नाही.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांनी विनंती आहे की हा जो ठराव लिहाल उदयाच्या उदया तर पाठवायचा नाही आहे. तर त्याची एकतर तो ठराव नीट लिहिला जावा सर्वांना माहितीसाठी दिले तर बरे होईल. त्यामध्ये आणखी त्रुटी असल्या तर त्यावर सुचना घेता आल्या तर बरे होईल.

**प्रकरण क्र. ६६ :-**

**विषय :-** शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणाचा कायदेशीर दर्जा निश्चिती करणे बाबत-प्राधिकरणास कायदेशीर स्वरुप देण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र. पापुयोह १०.२०००/प्र.क्र.३/पापु.२० दि.२९.२.००० अन्वये शहाड-टेमघर पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्तीसाठी ठाणे, भिवंडी व मिरा-भाईंदर महानगरपालिका या तिनही स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी असणा-या शिखर समितीकडे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली होती व या साठी सदर निर्णयाद्वारे शहाड-टेमघर देखभाल दुरुस्ती मंडळाची (शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरण) स्थापना करण्यात आली. परंतु, सदर दि.२९.२.२००० चे शासन निर्णयात या प्राधिकरणाचा/मंडळाचा कायदेशीर दर्जा काय राहिल हे घोषित करण्यात आले नाही. (उदा. स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/ धर्मदाय संस्था/ कंपनी कायदा १९५६ कलम २५ अंर्तगत कंपनी/कंपनी कायदा १९५६ अंतर्गत सर्वसाधारण व्यापारी कंपनी इ.) कायदेशीर दर्जा निश्चिती अभावी स्टेम प्राधिकरणाकडे खालील विषय पुढील व अंतिम कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत.

१. शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणाकडून करण्यात येणा-या निविदा, करारनामे किंवा अन्य कामकाजात कायदेशीर प्रश्न/न्यायालयीन दावा निर्माण झाल्यास स्टेमचा कायदेशीर दर्जा काय राहिल.

२. स्टेम प्राधिकरणाच्या राष्ट्रीयकृत बँकामधील चालू भांडवल, घसारा फंड, मासिक खर्चाच्या अल्प मुदत ठेवी/दिर्घ मुदत ठेवींवर मिळणा-या व्याज उत्पन्नातून आयकर(TDS) कपातीची शक्यता व कपात होवू नये म्हणून त्यासाठी पात्र म्हणून प्राधिकरणाचा घोषित कायदेशीर दर्जा.

३. सन २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ या वर्षातील उत्पन्नातून खर्च वजा जाता राहणा-या शिल्लक रक्कमेवर आयकर आकारणी होण्याची शक्यता किंवा स्टेम प्राधिकरणाचे उत्पन्न आयकर मुक्त आहे किंवा कसे याची कायदेशीर निश्चिती.

४. शासन निर्णय दि.२९.२.२००० अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजनेवरील कार्यरत क्षेत्रीय कर्मचारी/कार्यालयीन कर्मचारी/अधिकारी यांचे अनुज्ञेय ४ वर्षापुढील कालावधीसाठी प्रतिनियुक्ती आणि आवश्यक व इच्छुक कर्मचारी/अधिका-यांचे कायमचे समावेशन.

उक्त १ ते ४ विषयांसाठी स्टेमच्या विधी विषयक स्थितीबाबत स्पष्टीकरण होणे तातडीचे झाले आहे.

सबब या प्रकरणी मा. स्टेम प्राधिकरणाचे गव्हर्निंग समितीचे शिफारसीनुसार आणि या प्रकरणी (१) कायदा सल्लागार(CIDCO,MMRDA,MSRDC) श्री. के.एन.पटेल आणि (२) Indo-US-Financial Institutions Reform and Expansion Project , Nishith Desai Associates, Mumbai यांचे कडून प्राप्त सल्ला/प्रस्तावावर अभ्यास/सांगोपांग व सविस्तर चर्चा करुन सर्वसाधारण सभा खालील बाबींना मान्यता देत आहे.

१. शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणाचा कायदेशीर दर्जा (Legal status)म्हणून स्टेम प्राधिकरणाची कंपनी कायदा १९५६ चे तरतुदी अंतर्गत सर्वसाधारण व्यापारी कंपनी म्हणून नोंदणी व सदर कंपनी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी (Infrastructure Development Company)म्हणून वर्गीकृत करुन घेवून आयकर कायदयातील कलम ८० आय.ए.अंतर्गत असलेल्या तरतुदीचे अनुज्ञेय फायदे(उदा.प्रचलित १० वर्षे आयकर आकारणी मुक्त कंपनी इ.) पात्र असलेली कंपनी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

कंपनीमध्ये तिनही महानगरपालिका आणि ३४ गावे यांचे संबंधातील ठाणे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या सध्याच्या मत्ता मालकीनुसार भाग भांडवलाची रचना असावी संस्थेचे भाग भांडवलाचे प्रमाण मत्त्याच्या चालू मुल्यनिर्धारणानुसार ठरविणेत यावे व या कामी शहाड-टेमघर पाणी पुरवठा योजना आणि ५० द.ल.ली. योजनेची उपांगे हा ॲसेट कंपनीकडे पूर्णतः हस्तांतरणास मान्यता देण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महापालिकेचे भाग भांडवल विचारात घेताना मुळ योजनेतील ३१ द.ल.ली. कोटयाचे उपांगाची किंमत तसेच नव्याने निर्माण केलेल्या

५० द.ल.ली. योजनेच्या उपांगाची किंमत चालू मुल्यनिर्धारणानुसार मिरा-भाईंदर महापालिकेचे भांडवलासाठी विचारात घेण्यात यावी. कोणत्याही एका महानगरपालिकेस साधे बहुमताचे मालकी हक्क नसावे तसेच कंपनीचे कर्मचारी कंपनीतील भाग भांडवलत काही प्रमाणात मर्यादेत मालकी हक्क घेउ शकतील. त्या शिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एम.एम.आर.डी.ए. आणि सिकॉम या सारख्या आणि देशातील इतर वित्तीय संस्थाचा सहभाग आमंत्रित करुन भाग भांडवलाचे विस्तृतीकरण करण्याची शक्यता कंपनी आजमावू शकेल.

प्रचलित केंद्र आणि राज्य शासनाच्या पाणी पुरवठा आणि मलनिःसारण प्रकल्प योजना अन्य योजना हाती घेण्यास व त्यासाठी केंद्र व राज्य सरकार कडून मिळणारे अनुदान (Grant in aid) मिळणेस हि कंपनी पात्र असेल/असावी.

उक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती स्टेम तथा आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे मान्यतेसाठी व शासन निर्णय काढणेसाठी पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे व त्यांना या बाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेस प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. शासनाकडून कंपनी कायदा १९५६ अंतर्गत सर्वसाधारण व्यापारी कंपनी म्हणून नोंदणी करुन कंपनी म्हणून कायदेशीर दर्जा प्राधिकरणास देण्यास व शासन मान्यता प्राप्त झालेवर स्टेम प्राधिकरणाचे सामंजस्य करारातील मा. शिखर समितीचे आणि मा. कार्यकारी समितीची संरचनेत आवश्यक ते बदल करुन स्टेम प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची(कार्यकारी समिती) शासन मान्यतेने अधिकार व जबाबदाराची पुर्नरचना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शिखर समिती व संचालक मंडळ यांची रचना खालील प्रमाणे राहील.

**शिखर समिती :-**

शिखर समिती (गव्हर्निंग काउन्सिल) मध्ये दहा सदस्य असावे ठाणे महानगरपालिका, भिवंडी निझामपूर शहर महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिकांचे महापौर व आयुक्त, ठाणे जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कंपनीचे कार्यकारी संचालक असतील. मिरा-भाईंदर हे योजनेतील शेवटचे टोकाचे शहर असल्याने व या शहरास पाणी पुरवठा होणेसाठी अन्य कोणताही स्त्रोत नसल्याने वेळोवेळच्या मंजुर पाणी कोटयाचे पाणी मिळणेसाठी महापालिकेचे हक्क अबाधित राखणेसाठी विशेष म्हणून या महापालिकेने नियुक्ती केलेल्या आणखी दोन सदस्याची नेमणूक शिखर समितीमध्ये करणेत यावी. गव्हर्निंग काउन्सिलचे (शिखर समिती) अध्यक्ष, फिरत्या क्रमाक्रमाने(रोटेशन पध्दतीने) ठाणे महानगरपालिकेचे महापौर/भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे महापौर/मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे महापौर असतील. प्रत्येकाचा कार्यकाळ दोन वर्षाचा राहील. स्टेमचे कार्यकारी संचालक हे समितीचे पदसिध्द सचिव असतील.

शिखर समिती (गव्हर्निंग काउन्सिल)ची खालील कार्ये राहतील.

१. कंपनीची धोरणे तयार करणे.
२. कंपनीची वार्षिक कार्य योजना मंजुर करणे.
३. कंपनीच्या कार्याचे वेळोवेळी संनियंत्रण (Monitor the performance)

**संचालक मंडळ:-**

कंपनीचे व्यवस्थापन व दैनंदिन कारभार संचालक मंडळामार्फत केला जाईल. गव्हर्निंग काउन्सिलने नेमून दिलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संचालक मंडळाची राहील. संचालक मंडळाचे सुमारे ७ संचालक असतील असे प्रस्तावित करण्यात येते. ठाणे महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे लोकशाही हक्क अबाधित राखण्यासाठी कंपनीच्या आर्टीकल्स ऑफ असोसिएशन मध्ये कंपनीच्या संचालक मंडळावर, ठाणे महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना आपले प्रतिनिधित्व असण्याच्या हक्काची तरतूद करता येईल. त्यानुसार प्रत्येक भागभांडवलदार (महानगरपालिका) आप-आपल्या आयुक्तांची पदसिध्द संचालक म्हणून नियुक्ती करेल. राज्य शासन सुध्दा आपला एक नामनिर्देशित संचालक नियुक्त करेल. संचालक मंडळ तांत्रिक, वित्तीय आणि लेखापरिक्षा/चार्टर्ड अकाउन्टन्सी क्षेत्रामधील तज्ञ असे दोन उर्वरित स्वतंत्र संचालक नेमणूक करतील.

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, संचालक मंडळाचे अध्यक्ष असतील. संचालक मंडळ दैनंदिन कार्यांची जबाबदारी कार्यकारी संचालक व कर्मचा-यांवर सोपवेल जे कॉर्पोरेट

गर्व्हनन्सच्या तत्वावर आधारित असेल. व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कंपनीच्या आर्टीकल्स ऑफ असोसिएशन मध्ये ठराविक महत्वाचे निर्णय केवळ संचालक मंडळाच्या आणि भाग भांडवलदारांच्या पूर्व परवानगीनेच घेता येतील अशी तरतुद करण्यात यावी. एक स्वतंत्र पूर्ण वेळ कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक असतील व ते संचालक मंडळाचे सचिव राहतील.

संचालक मंडळाची रचना भारतीय कंपनी कायदा १९५६ आणि तत् संबंधीचे वेळोवेळचे कायदयाचे तरतुदी
प्रमाणे वेळोवेळी ठरविणेत/करणेत येईल.

३. स्टेम प्राधिकरणाच्या कार्याच्या व्याप्तीची वाढ व पुर्नरचना करुन त्यात अस्तित्वात असलेल्या व्याप्तीसह खालील बाबींचा समावेश करुन सेवेची व्याप्ती वाढविणेस मान्यता देण्यात येत आहे.

अ. उद्योग/ मोठया प्रमाणावर वापर करणा-यांना संस्थांना थेट पाणी विक्री करणे. परंतु प्रमुख उदिदष्ट हे सहयोगी संस्था, ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि भिवंडी निझामपूर महानगरपालिका यांना अखंडीत दैनंदिन पाणी पुरवठा करणे हेच राहील. वेळोवेळची सदर सहयोगी संस्थांची पाण्याची गरज भागविले नंतरच उदयोग/मोठया प्रमाणावर वापर करणा-या अन्य संस्थांना थेट पाणी पुरवठा करण्याचा विचार करता येईल.

ब. इतर प्रदेशात पर्यावरण/मुलभूत सेवा इ. कार्य करणे/स्पर्धेत उतरणे (नजीकचे भविष्य काळात प्रदेश व राज्य, मध्यम तसेच दिर्घ कालीन प्रकल्प आखणे, राबवणे, परिचलन करणे) देशांत व परदेशातही कार्य करणे.

क. पर्यावरण आणि/किंवा मुलभूत सुविधा (पाणी पुरवठा, वितरण व्यवस्था, पाणी पुरवठा योजना/प्रकल्प, मलनिःसारण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन इ.) सेवांबाबत सहयोगी आणि अन्य इतर कोणत्याही स्थानिक संस्थांशी करार करणे व ते प्रकल्प राबवणे परिचलन करणे आणि पिण्याचे पाण्याचे स्त्रोत विकसीत करणे, धरण बांधणे इ.

ड. कन्सलटन्सी सुविधा पुरविणे/देणे इ.

४. सध्या स्टेम प्राधिकरणाकडे जे क्षेत्रिय कर्मचारी (एकूण ७१) आणि कार्यालयीन कर्मचारी/अधिकारी (एकूण १८) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत त्यांनी कंपनीच्या स्थापनेनंतर दोन वर्षाचे कालावधीनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मुदत पूर्व स्वेच्छानिवृत्ती घेवून कंपनीचे कायम कर्मचारी म्हणून रहावे किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सेवा स्टेमकडे कायमची वर्ग करुन (Permanant Absorbtion) स्टेम कंपनीचे कायम कर्मचारी म्हणून रहावे अथवा त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे परत जावे हे पर्याय देण्यात यावे. या प्रारंभिक दोन वर्षाचे कालावधीत कर्मचा-यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पदावर हक्क, लाभ, सेवा व शर्तीचे संपूर्ण संरक्षण करण्यात येईल. याबाबत सध्या कार्यरत असलेल्या क्षेत्रीय कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी यांचे बाबत उक्त प्रमाणे प्रस्ताव शासनाकडे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविणेस तसेच चार वर्षाचे पुढील कालावधीसाठी प्रतिनियुक्ती कालावधी वाढवून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसा प्रस्ताव मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती, स्टेम पाणी पुरवठा प्राधिकरण यांनी शासनाकडे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

५. कायदेशीर दर्जा ठरविणेसाठी प्रथम शासनास प्रस्ताव पाठवून मंजुरी मिळविणे, मत्ता व दायित्वाची किंमत/रक्कमा ठरविणे, व कंपनीचे कंपनी कायदयाखाली नोंदणी प्रस्ताव सादर करणे, त्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी देणे कंपनीची व्याप्ती, संरचना, अधिकार, नियमावली कर्तव्ये इ.चा सविस्तर प्रस्ताव तयार करणे अशी पुढील कार्यवाही करण्यास कार्यकारी समिती, शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सध्या शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणाशी निगडीत काही देणी व वाद आहेत. त्याची वाद/देणी यादी सोबत जोडपत्र - १ मध्ये दिली आहे. सर्वसाधारणपणे देण्यामध्ये प्रलंबित प्रकरणे, वित्तीय देणी आणि कर्मचा-यांची प्रकरणे आहेत. जोडपत्र - १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अ.क्र. ३,४ व ६ नवीन संस्था स्टेम ॲथोरिटीची देणी आपल्यावर घेईल. त्याशिवाय, स्थानिक संस्थांनी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वा

राज्य शासनाने दिनांक २९.२.२००० पूर्वी केलेल्या कार्यवाहीमुळे काही नवीन वाद/देणी उदभविल्यास याची जबाबदारी तिन्ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हापरिषद, ठाणे यांचेवर ग्रामीण भागा विषयी राहिल व ही जबाबदारी कंपनीची राहणार नाही.

वरील अ.क्र. १ ते ६ प्रमाणे मान्यता देण्यात येत असून त्याप्रमाणे आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरिता अध्यक्ष, कार्यकारी समिती, शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरण तथा आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण ६८ चे वाचन केले.)

**रतन पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने, प्रथम मा. महापौर, मा. आयुक्त व सन्मा. सभागृह यांचे हार्दिक अभिनंदन व आभार प्रकट करतो की, आज मिरा भाईंदरच्या कारर्कीदीमध्ये सुवर्ण अक्षराने लिहिणारा निर्णय घेण्यात आलेला आहे. मा. महापौरांच्या व सन्मा. नगरसेवकांच्या कार्यकाळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर पूर्व-पश्चिम जोडणारा उड्डाणपुल मा. मुख्यमंत्री मनोहर जोशीसाहेबांनी ५० एम.एल.डी. पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन केलेली योजना पुरी झाली व आज ब-याच वर्षापासून प्रलंबित असलेली टेंबा आरोग्य केंद्र महापालिकेत हस्तांतरीत होत आहे व त्या जागेवर महापालिकेच्यावतीने एक अद्ययावत रुग्णालय उभे राहून मिरा भाईंदरमधील तमाम नागरिकांना लाभ घेता येईल. परत एकदा मा. महापौरांचे व आयुक्तांचे अभिनंदन करतो.

**जयंत पाटीलः-**

अध्यक्ष महाशय, आज पहिल्यांदा सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सांगितले, आम्हाला आनंद वाटला. आपण पण हे सांगितले ती मागणी मा. महापौरांनी मान्य केलेली आहे. त्यामुळे मी देखील त्यांचे अभिनंदन करतो. माझ्या दृष्टिने आरोग्य केन्द्राची मागणी ही प्रमुख मागणी असायला पाहिजे. ही मागणी एक आवश्यक बाब ठरणार आहे. परंतु, या ठिकाणी काही शंका नक्कीच उपस्थित झाल्या असतील. साडे सहा करोड या शहरावर कर्ज दिलेले आहे. या विषयाचा जो गोषवा-यासोबत कर्मचारी वर्गाची माहिति दिली आहे. त्यातील श्री. अमरनाथ पाटील हे एक वर्षानी निवृत्त होणार आहेत. म्हणजे त्यांना अजून एक वर्ष शिल्लक आहे. त्यांना तीन लाख रुपये दयायचे आहेत. ती रक्कम देय आहे आणि त्या रक्कमेचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्यांची ही शिल्लक रक्कम आहे. ती रक्कम ट्रान्सफर करुन घ्यायची आहे. म्हणजे ती रक्कम ६ कोटी ४४ लाख रुपयेएवढी आहे. यानंतर या ठिकाणी एक छोटासा प्रश्न करतो. अध्यक्ष महाशय, या लोकांचा पगार अंदाजे रु. १०,०००/- पर्यन्त आहे. म्हणजे श्री. अमरनाथ पाटील यांचे मासिक वेतन रु. १४,४६०/- एवढे आहे आणि त्यांचे वार्षिक वेतन हे रु. १,७३,५२०/- एवढे होउ शकते. वास्तविक पाहता याच्यापेक्षा कमी वेतनामध्ये आपल्याला कर्मचारी मिळू शकतील. शेवटचे ठोक ४ दाखविले आहे.

**मा. आयुक्तः-**

३४, ३५, ३६ त्याचेदेखील शिल्लक आहे. १८ नंबरचेदेखील आहे. सर्वजण रु.५००/- मानधनावर आहेत. हे कायमस्वरुपी नाहीत. सर्व आरोग्य केन्द्रे ताब्यात घ्यायची आपली जबाबदारी आहे.

**मोहन पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, महानगरपालिकेकडे प्राथमिक आरोग्य केन्द्र हस्तांतरण करण्याबाबतचा विषय या ठिकाणी आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून आम्ही नेहमी बोलतो की, बोलण्यापेक्षा कृतीवर विश्वास ठेवायचा. मी माझ्या पक्षाच्या वतीने महापौर मॅडमचे अभिनंदन करु इच्छितो. जे नगरसेवक तिस-यांदा निवडून आलेले आहेत. नगरपालिका स्थापन झाल्यापासून हा प्रश्न पडलेला होता आणि आज महापौरांच्या कार्यकालामध्ये हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. या सभागृहामध्ये जे नवनिर्वाचित सदस्य निवडून आलेले आहेत. त्या सदस्यांना अतिशय आनंद झाला असेल. महापौर मॅडमबरोबर मी आयुक्तसाहेबांचेदेखील अभिनंदन

करु इच्छितो. कारण आपण मंत्रालयापर्यन्त धाव घेउन अथक प्रयत्न केले. अशाप्रमाणे आपण आरोग्य सेवा सुरु केली. मिरा भाईंदर शहरामध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. आपण स्थायी समितीच्या निदर्शनास आणून प्रस्ताव मंजूर करुन घेतला. बजेट मंजुर करुन घेतले. दवाखाने अल्पावधीतच चालू केलेले आहेत. सदर कामी प्रस्ताव तयार करुन लोकप्रतिनिधीसमोर आणला. खाजगी फी नुसती वाढत चालली आहे. डॉक्टर हा एक सेवाभावी वर्ग आहे. सेवाभावी वर्ग असुनसुध्दा ही वाढती महागाई पाहून फी पण वाढत चालली आहे. या स्थापन होणा-या दवाखान्यामुळे अल्प प्रमाणात फी ठेवून चांगल्या दर्जाचा प्रतिसाद दिसत आहे आणि चांगल्या डॉक्टर्सची सेवा देत आहे. आपल्यापुढे पडलेला प्रश्न मांडला गेला. त्यामुळे त्यावेळी हा विषय स्थायी समितीपुढे आलेला होता. परंतु, आम्ही त्यावेळी प्रशासनाला विनंती केली. प्रशासनदेखील आज या ठिकाणी आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्र महानगरपालिकेकडे हस्तांतरण करताना संपूर्णपण हस्तांतरण करुन घ्यावे. परंतु, प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या इमारतीची अवस्था व्यवस्थित नाही. त्याचप्रमाणे, हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक साधनसामुग्री नाहीत अशी परिस्थिती आहे. तरीदेखील प्राथमिक आरोग्य केन्द्र हस्तांतरण होताना विनामुल्य मिळायला पाहिजे ही आमची आग्रहाची भूमिका आहे. त्याचप्रमाणे उत्तन येथेदेखील असलेला दवाखाना ताब्यात मिळाला पाहिजे. या कामी मा. वसंतराव डावखरे उपसभापती यांनी स्वतः जातीने लक्ष घालून प्राथमिक आरोग्य केन्द्र महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यासाठी प्रयत्न केले. आजचे गृहराज्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्या दालनात सभा बोलावली होती. प्रशासनाच्यावतीने आयुक्तदेखील होते. प्रशासनाच्यादेखील प्राथमिक आरोग्य केन्द्र लवकर ताब्यात यावे या भावना होत्या. प्राथमिक आरोग्य केन्द्र लवकर ताब्यात आल्यावर सर्व सदस्य त्याचे स्वागतच करतील. प्राथमिक आरोग्य केन्द्र ताब्यात घेण्यासंबंधी काही त्रुटया असतील तर त्याचे समाधानपूर्वक निरसन व्हावे. आपल्याकडे आरोग्य खात्यात कायमस्वरुपी कर्मचारी आहेत. त्यांचे मार्गदर्शन घेउन हॉस्पिटल आपल्या ताब्यात घ्यावे हा प्रश्न बाकी आहे. हॉस्पिटलमध्ये काय उपलब्ध करुन दयायचे हा प्रश्न आहे. महानगरपालिकेने आरोग्य सेवा ही दिलीच पाहिजे. मिरा भाईंदर नगरपालिकेचा नगरसेवक झालो तेव्हापासून बोलतो आहे की, या शहरात आरोग्य सेवाच काय? चांगले रस्ते उपलब्ध करुन दयायचे, सांडपाण्याच्या गटाराकडे लक्ष दयायचे. सगळया सेवा-सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन दयायच्या. कारण त्यावेळी बहुतेक सेवा-सुविधांचा अभाव होता. आज या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केन्द्र ताब्यात घेण्याचा विषय आणलेला आहे. त्या संबंधात सन्मा. सदस्य रतन पाटील यांना मी धन्यवाद देईन. कारण आपली मागणी पहिली होती. तुमच्या समवेत आम्ही या गोष्टीचे समाधान व्यक्त करायला तयार आहोत. आम्ही आमच्या पक्षाच्या भूमिकेतून आपण आम्हाला साथ दयाल अशी अपेक्षा बाळगतो. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी ज्या सुचना मांडल्या. त्या सुचनांचे पालन व्हावे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. त्याबददल मी आयुक्तसाहेबांना धन्यवाद देईन. परंतु, पगार तुम्ही काढला तरी प्रत्येक अधिकारी पगार घेतो. अधिका-यांच्या म्हणण्याने काम केले पाहिजे. म्हणून आज या ठिकाणी शिवमूर्ती नाईक हे नगरपालिकेत असताना त्यांनी प्रयत्न केले. मुख्याधिका-यांनीदेखील प्रयत्न केले. हा विषय या ठिकाणी आणल्याबददल सर्वांचे धन्यवाद. प्रशासनाने तिळगुळ आणल्याबद्दल धन्यवाद देतो.

**रोहिदास पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, एकतर पहिल्यांदा हा प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे. परंतु, ते काही आताच्या भाषणात समजले नाही. प्रशासनाने टिपणी दिली. हे आरोग्य केन्द्र पूर्ण झाल्याची प्रक्रिया पूर्ण झाली की नाही. याचा टिपणीत कुठेही उल्लेख आलेला नाही. नगरपालिकेने या प्रस्तावाचा पाठपुरावा केला. त्याच अनुषंगाने प्रशासनाकडे चाललेल्या कामकाजातून आतापर्यन्त नक्की काय झाले? त्याच पध्दतीने मी हे धोरण आपल्याकडे अशा अशा पध्दतीने मांडले आहे. इमारतीसहित, जागेसहित, कर्मचा-यांसहित आपण त्या कर्मचा-यांच्या वेतनासाठी मंजुरी मागता, जागेच्या किंमतीसाठी मंजुरी मागता.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या बोलण्याचा उद्देश कदाचित असा असेल की, हा विषय सभागृहापुढे कशासाठी आणला आहे? नगरसेवकांच्या माध्यमातून महापालिकेकडे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सेवा निवृत्ती होईपर्यन्त वेतन महापालिकेत करावयाचे आहे. तरी याबाबत आपले अभिप्राय शासनास पाठविणे ही विनंती राहिल. ही एक धोरणात्मक बाब आहे. आमच्या महापालिकेत असे ठराव दिले तरी त्या अनुषंगाने उत्तर देता यावे म्हणून हा प्रश्न सभागृहामध्ये आलेला आहे. लॅन्ड कॉस्ट संदर्भात आपण प्रश्न विचारला. त्यामुळे या ठिकाणी लॅन्ड कॉस्ट उल्लेख

होणे जरुरीचे आहे. उत्तनच्या आरोग्य केन्द्रासाठी ३ कोटी ५ लाख अशाप्रकारची रक्कम मागितली होती. तो प्रश्न मला वाटते शासन दरबारी पडलेला आहे. याच्याबाबत खुलासा विचारला होता की, प्राथमिक आरोग्य केन्द्र ताब्यात घेते वेळी त्या केन्द्रात काम करणा-या कर्मचारी वर्गाची जबाबदारी महानगरपालिका घेणार काय? उत्तन आणि भाईंदरमध्ये दोन आरोग्य केन्द्रे मागितली आहेत. याच्यामध्ये जे कायमस्वरुपी कर्मचारी वर्ग आहे. त्यांनाच फक्त या सेवेत समाविष्ट करुन घेणार आहेत. टेम्पररी आहेत. त्यांना या सेवेत समाविष्ट करण्यात येणार नाही. त्याच्यासाठी इतर स्टॅटॅस्टिक करा.

**रोहिदास पाटील :-**

या व्यतिरिक्त इमारती, साधनसामुग्री, कर्मचारी वसाहत या इमारती आहेत. जागा आहे.

**मा. आयुक्त :-**

इमारती आणि स्टाफ हे सर्व बघूनच मगच ताब्यात घेणार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी जागेच्या किंमतीची मागणी केलेली आहे. आम्ही त्याला समर्थन करायला उभे राहिलो. ही चुक आहे असे मला वाटत नाही. या असल्या सर्व व्यवस्थेसहित देता की कर्मचारी म्हणून आपण देता.

**मा. आयुक्त :-**

याचा अर्थ गव्हर्नमेन्टला फक्त कर्मचारी आरोग्य केन्द्राचा प्रश्न विचाराधीन आहे. प्रशासकीय स्तरावर अशा प्रकारचे अधिकार पाठविलेल्या वेळेला आपल्याला महासभेपुढे ठराव होउन मग शासनाला उत्तर दयावे. यासाठी हा ठराव आपल्यापुढे मांडलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

जमिनीच्या हक्कासहित दोन्ही आरोग्य केन्द्राच्या हस्तांतराचे विषय येते वेळी तुम्ही इमारतीच्या त्या खालील जागा व साधनसामुग्रीसहित ताब्यात घेणे हे कायदयाने योग्य आहे. म्हणून त्या कर्मचा-यांना आस्थापनेत घेण्याची मंजुरी देत आहे.

**मा. आयुक्त :-**

आपले नुसतेच कर्मचारी ट्रान्सफर करण्यामध्ये शासनाला इन्टरेस्ट नाही आहे. शासनाचे उद्दिष्ट असे आहे की, कर्मचारी सेवेत समाविष्ट करुन घ्यायचे असा उल्लेख करा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मी या ठिकाणी एक सुचना करतो की, जो ठराव सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी मांडला. याच्यामध्ये मी सुधारित सुचना करु इच्छितो. या सभेमध्ये आता आयुक्तसाहेब टेम्पररी या विषयावर बोलले. त्याबददल मला माझे मत मांडायचे आहे की, चार महिलांनी या ठिकाणी मदतनीस म्हणून गेले २०-२५ वर्षे सेवा केलेली आहे. त्यांचा विचार या सभागृहात जरुर करावा. आपण त्यांना पगार देतो. पण या चार जणांनी आपली जिन्दगी मदतनीस म्हणून आयुष्यभर घालविली आहे. तरी त्यांनासुध्दा समाविष्ट करुन घेण्याचा ठराव करावा. त्यांना त्याच्यामध्ये समाविष्ट का करु नये? हे सर्व भाईंदरवासिय आहेत. त्याच्यामध्ये तुम्ही समाविष्ट करुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे:-**

या प्रस्तावामध्ये प्रकरण क्र. ६८ घेण्या अगोदर मला सांगायचे आहे की, महाराष्ट्र विधानसभा विधीमंडळ १९८७ साली ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे या विरोधी पक्ष नेत्या होत्या. त्यावेळेचा एक प्रश्न असेम्बलिंग झाला होता. त्याचा प्रस्ताव जमिन मागणीचा त्यावेळेला विधीमंडळामध्ये मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते. त्यावेळी नगरपालिकेची आर्थिक स्थिती गंभीर होती. त्यामुळे ते काम पुर होउ शकले नाही. हा प्रस्ताव लवकरात लवकर काही का असेना पण आलेला आहे. त्यामुळे मी त्याचे स्वागत करतो. हा प्रस्ताव मुंबई मंत्रालय यांच्या क्रमांक एम.बी.एम.सी./२००४/प्र.क्र.३/नवि-२८ दि. ५/१/२००४ याच्यामध्ये दोन-चार दिवस लागतात. हा विषय वास्तविक पाहता गेल्या महिन्याच्या महासभेत यायला पाहिजे होता. माझ्या माहितीनुसार हे पत्र नगरसचिवांच्या टेबलावर पडलेले होते. आपल्या काही लोकांनी ते कलेक्ट केलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

७ तारखेच्या जानेवारीला हे पत्र आलेले आहे. भाईंदरच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना ताबडतोब पत्र लिहिले. तुमचे किती कर्मचारी आहेत? त्यांच्या पगारावर किती खर्च होतो? याची माहिती त्यावेळी

उपलब्ध नव्हती. मग महासभेचे बजेट १२ तारखेला दिले गेले. जास्तीत जास्त पाच-सहा दिवसच मिळाले. पण त्याची माहिति मिळाली नाही. त्यामुळे मागील महासभेत घेणे शक्य नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, हा जो दवाखाना ताब्यात घेतो. यामध्ये महसुल डिपार्टमेन्ट आहे. या ठिकाणी इलेक्ट्रिक बिलाचा प्रश्न आहे. लायबिलीटी चार्जेस आहेत. ते तपासून पहावेत. माझ्या माहितीनुसार लाईट बिल भरले गेले नव्हते. मागच्या वेळेला स्टँडिंग कमिटीला हा विषय आलेला होता. किती स्टाफ आरोग्य केन्द्रावर भरायचे होते. मेडिकल ऑफिसर केन्द्र आहे. मदतनीस केन्द्र आहे. याच्यामध्ये याचे काही प्रकार दिसत नाहीत. तो दिला असता तर बरे झाले असते. अनुक्रमांक २ वर श्री. अमरनाथ पाटील आहे आणि अनुक्रमांक २० वर सोफिया ही महिला आहे. त्याप्रमाणे नोंद करुन घ्यावी. ती उत्तनची रहिवासी आहे. तिच्या नावावर बदल करुन घ्यावा. जी जागेची नावे दिली आहेत. त्याचे स्टाफ पॅटर्न काय आहे? आणि प्रायमरी हेल्थ सेंटर दोन आहेत. प्राथमिक आरोग्य केन्द्राची जागा आहे. फक्त डॉक्टर लिहिलेले आहे. माझ्या माहितीनुसार डॉ. श्रीराम धोत्रे उत्तनला डॉक्टर असले पाहिजेत. कुठेही याचा उल्लेख केलेला नाही. ही टिप प्रशासनाने व्यवस्थित दयायला पाहिजे. आपण शासनाला प्रस्ताव पाठवणार आहे. त्यामुळे कोणते कर्मचारी किती तारखेला कामाला लागले. त्यांची सेवा कशी आहे? त्याचे डिटेल्स, बायोडेटा ॲड केला तर बरे होईल. या संपूर्ण जागेचा सर्वे केला पाहिजे. जागेचा सर्वे आजपर्यन्त झालेला नाही. आजूबाजूच्या जागा आहेत. त्या प्रायव्हेट जागा आहेत. त्या जागेचा सर्वे झालेला आहे. म्हणून पालिकेने संपूर्ण जागेचा सर्वे करुन बाउन्ड्री फिक्स करुन घ्यावी. म्हणजे त्या जागेवर अतिक्रमणे होणार नाहीत. याची दक्षता महापालिकेने घ्यावी. शासनाकडून आलेल्या पत्रात काय लिहिले आहे? ते मला माहिती नाही. ट्रान्सफरबद्दल दरवेळी मी स्टँडिग कमिटी आणि महासभेत सांगत असतो की, व्यवस्थित लेखी देत जा. परत दिले असते तरी बरे झाले असते. जी. आर. दयायचा तर तो वेळेवर देत नाहीत. गोषवारा आणि प्रकरण आपण या ठिकाणी आणले आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्र महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबतचा तो अधिकार आहे. त्याच्यामध्ये या सर्वाचा उल्लेख करुन आपण परमिशन दयावी.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, प्राथमिक आरोग्य केन्द्र हा विषय नगरपरिषद काळापासूनचा ज्वलंत विषय होता. तो जवळपास सोडविण्याच्या मार्गावर आहे. महापौर मॅडम आपल्या अध्यक्षतेखाली या शहरात वृक्षारोपण झालेले आहे. महापौर मॅडम, आपल्या कृपेने बालवाडीतील शिक्षकांचे मानधन ५०० रुपयावरुन १००० रुपये करुन त्यांच्या मानधनात साखर घातली आहे. ओव्हर ब्रीजच्या उद्घाटनाचा विषय ठेवला होता. पुढे एक महिन्याच्या काळात दोन आरोग्य केन्द्रे सुरु झाली आहेत आणि काही सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. महिलांसाठी एक समिती स्थापन झाली आहे. त्यामुळे एका अर्थी प्राथमिक आरोग्य केन्द्र हा ज्वलंत विषय जवळपास पारित झाला असे समजायला हरकत नाही. सध्या आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये वसंत फुलणार आहे व शरदाचे चांदणे आणि सोनियाचे दिवस चालू आहेत आणि हे सगळे अटल असे राहणार आहे. त्यामुळे आपण आयुक्त साहेबांचे, महापौरांचे आणि उपस्थित सर्व सदस्यांचे कौतुक करण्यास काही एक हरकत नाही असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

ते उत्पन्न आपल्याला मिळणार आहे. आपण उत्पन्नामध्ये जसे दाखवितो तसे खर्चात दाखवितो. उल्लेख या ठिकाणी केला नसला तरी तसा उल्लेख करा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर नगरपालिकेची १२ जून १९८५ साली स्थापना झाली. तेव्हापासून आपल्या शहरवासियांची मागणी होती की, प्राथमिक आरोग्य केन्द्र आपल्या कालावधीत स्थापन होउन शहरवासियांना चांगली वैद्यकिय आरोग्य सेवा उपलब्ध करुन दयावी. सर्वांनी या गोष्टीला पाठपुरावा केला होता. आपले आदरणीय नेते आणि प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट मेन्डोसा यांच्या आशीर्वादाने आणि त्यांच्या कर्तृत्वाने आतापर्यन्त सांगण्यात आले की, चांगली गोष्ट करायची असेल तर चांगला पायगुण लागतो. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मेन्डोसा यांच्या पायगुणामुळे नवीन चांगले कार्य होत आहे. आता या ठिकाणी तिळगुळाचा उल्लेख झाला. तिळगुळ म्हणजे याचा अर्थ चांगले कार्य झाले पाहिजे असा होतो. एकदा निर्णय घेतला की, त्याची अंमलबजावणी योग्य रितीने करणे हे आपले कर्तव्य आहे. महापौरांनीही निर्णय दिला ही एक आनंदाची बाब आहे. २६ जानेवारीपासून आपण सुरुवात केली. आरोग्य केन्द्राचे उद्घाटन केले. मा. श्री.

वसंतराव डावखरे उपसभापती यांच्या हस्ते ते उद्‌घाटन झाले. गटार, रस्ते यांच्या विकासाची पण काही कामे पूर्ण झालेली आहेत. एक-दोन आरोग्य केन्द्रे उघडायची आहेत. बाकीची पण आहेत. हे सर्व लोकांपर्यन्त शेवटी पोहोचतीलच आपल्या भारत देशाचे उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांच्यापर्यन्त तिळगुळ पोहोचले नाहीत. मिरा भाईंदर परिसराचा उल्लेख केला. ती शंका मांडली आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने हे यशस्वी झालेले आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, सन्मा. सदस्य जयंत पाटील, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी चांगल्या सुचना केलेल्या आहेत. त्या सुचनांची नोंद घेउन ठराव मांडत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, जिल्हा परिषदेकडील आरोग्य केंद्र महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत जो आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी हा विषय आलेला आहे मला वाटते मघाशी मी बोललो तिकडे त्याची जी जमा रक्कम आहे. ती हस्तांतरित करावी या ठरावास मी मंजुरी देत आहे.

**मा. महापौर :-**

ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६८ :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे बाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

मे. कक्ष अधिकारी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे क्र. एम.बी.एम.सी./ २००४/प्र.क्र.-३/नवि-२८ दि. ५/१/०४ नुसार मिरा भाईंदर महापालिका हद्दितील भाईंदर पश्चिम व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे व त्या अनुषंगाने दोन्ही आरोग्य केंद्रामधील कर्मचा-यांचे सेवा निवृत्त होईपर्यंतचे वेतन व भत्याचा खर्च, सेवा निवृत्ती लाभ महानगरपालिकेने करावयाचा असून या बाबतचा अभिप्राय मा.महासभेचे मंजुरीने शासनाकडे कळविणे आहे. त्यानुसार कर्मचा-यांचे मासिक वेतन, वार्षिक वेतन व निवृत्ती काळापर्यंतचे वेतन तसेच निवृत्ती नंतरचे अन्य लाभ इत्यादी एकूण आर्थिक बोजा अंदाजे रु. ६.५० कोटी इतका होणार आहे.

सोबतचे परिशिष्ट 'अ' प्रमाणे भाईंदर पश्चिम व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचा-यांची संख्या ३७ असून त्यापैकी १८ व ३४ ते ३७ कर्मचारी मानधनावर असून त्यांना वेतनश्रेणी लागू केलेली नाही. तसेच अनु. क्र. ३४ व ३५ या कर्मचा-यांची शासन नियमानुसार निवृत्तीचे वयापेक्षा जास्त वय असल्याने या आस्थापनेवर नेमणूक देता येणार नाही. भाईंदर व उत्तन या दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्राचा मासिक वेतनाचा खर्च रु. ३,००,०००/- इतका आहे. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (६) नुसार सार्वजनिक रुग्णालये व दवाखाने बांधणे किंवा संपादन करणे व सुस्थितीत ठेवणे ही अत्यावश्यक बाब असल्यामुळे हि दोन्ही आरोग्य केंद्रे यांचे जागा व इमारतीसह महानगरपालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्यास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच याकामी संबंधित कर्मचा-यांची जी देय रक्कम जि.प.ठाणे यांच्याकडे आहे. ती वर्ग करुन घेण्यात यावी. तसेच ही आरोग्य केंद्रे लवकरात लवकर हया महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी मा. आरोग्य खात्यास सांगण्यात यावे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम मी एक शोकप्रस्ताव मांडू इच्छितो मिरा भाईंदर शहरातील स्वातंत्र्यसैनिक श्री. भालचंद्र अनंतराव रकवी यांच्या पत्नी कैलासवासी प्रेमा भालचंद्र रकवी यांचे गेल्या ३१/०१/२००४ तारखेला निधन झाले. त्याबद्दलचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**रोहिदास पाटील:-**

भाईंदर (पूर्व) तलाव रोडकडे राहणारे माधव जोशी मारवाडी समाजातील समाजसेवक होते. त्यांचे निधन झालेले आहे. बंदरवाडी स्मशानभूमीच्या बांधकामात त्यांचा हातभार होता. तरी सदरच्या शोक प्रस्तावात त्यांचेसुध्दा नाव समाविष्ट करावे.

**आसिफ शेख :-**

आपल्या मिरा भाईंदर मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि संपूर्ण महाराष्ट्रातील नव्हे तर किंबहुना भारतातील असे प्रसिध्द डॉक्टर आणि आपल्या येथील स्थानिक रहिवासी कैलासवासी डॉक्टर विश्वास साव यांचे नुकतेच निधन झाले. त्याबददल ही सभा शोक व्यक्त करीत आहे असा ठराव या ठिकाणी मांडत आहे.

**दुखवटा ठराव क्र. ६० :-**

मिरा भाईंदर शहरातील नागरिक सन्मा. स्वातंत्र्यसैनिक श्री. भालचंद्र अनंतराव रकवी यांच्या पत्नी प्रेमा भालचंद्र रकवी यांचे दिनांक ३१/०१/२००४ रोजी निधन झाले.

तसेच खारी तलावाकडे राहणारे नागरिक माधव जोशी, मारवाडी समाजातील समाजसेवक यांचे निधन झाले आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर मेडिकल असोशिएशनचे माजी अध्यक्ष आणि संपूर्ण महाराष्टातील नव्हे तर भारतातील प्रसिध्द डॉक्टर आणि स्थानिक रहिवासी कैलासवासी डॉक्टर विश्वास साव यांचे नुकतेच निधन झाले.

यांच्या निधनामुळे या शहराचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याकरिता ही सर्वसाधारण सभा शोक व्यक्त करित असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करित आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे अनुमोदन :- श्री. रोहिदास पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०३.४५ वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**